# संपादकीय

## सूरीनाम मध्ये संपन्न झालेले सातवे विश्व हिंदी संमेलन

जागतिक मराठी परिषदेची अधिवेशने मॉरिशस, इस्त्रायल, अमेरिका या देशात झाली तेव्हा अनेकांना आनंद वाटला; पण काही जणांना विस्मयही वाटला. महाराष्ट्रातूनच आता मराठी हद्पार व्हायची लक्षणे दिसायला लागली आहेत, मुंबईत मराठी माणूस अल्पसंख्य होऊ लागलाय आणि मराठी भाषा मरणासन्न होऊ घातलीय अशी अवस्था असताना दीडदोनशे लेखककवींनी परदेशात दोन दिवस मराठीचा झेंडा फडकवत आपल्या टेंभा मिरवायचा - ही गोष्ट अनेकांना हास्यास्पद वाटायची. पण आता जागतिक मराठी परिषदेत पूर्वीचे सळसळते चैतन्य उरलेले आहे असे दिसत नाही; फक्त या परिषदेची औद्योगिक-व्यावसायिक शाखाच काय ती  मा. मनोहर जोशी यांच्या आधाराने काहीतरी धडपड करताना दिसते आहे. साहित्याच्या अंगाने होणाऱ्या कार्यक्रमांना त्या मानाने गौणत्व लाभलेले दिसते. जागतिक मराठी परिषदेच्या निमित्ताने सवलतीच्या दरात परदेश प्रवासाची स्वप्ने बघणाऱ्या लेखक कवींची त्यामुळे काही अंशी निराशा झाली असण्याचा संभव आहे. शरदराव पवार, मनोहर जोशी, प्रभृतींच्या पुढाकाराने खरे तर जागतिक मराठी परिषदेच्या कामकाजाला अधिक व्यापक रूप यायला हवे.

हे सांगण्याचे कारण असे जूनच्या दुसऱ्या आठवड्यात सूरीनाम या छोटेखानी देशात पार पडलेले सातवे विश्व हिंदी संमेलन. या संमेलनासाठी केंद्र सरकारतर्फे ४ कोटी ७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे प्रतिनिधी म्हणून जाणाऱ्या व्यक्तींमध्ये राज्यसभा, लोकसभा सदस्य, राजकीय नेते आणि सरकारी अधिकारी यांची मोठ्या प्रमाणावर वर्णी लागणे अपरिहार्यच! पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी परदेश दौऱ्यावर जाण्याआधी या संमेलनाला जाणाऱ्या प्रतिनिधींपैकी ७१ लोकांच्या यादीला मंजुरी दिली होती. वेगवेगळ्या  राज्यसरकारांच्यातर्फेही ७०/८० प्रतिनिधी गेले. त्यांचा खर्च अर्थातच त्या त्या राज्य सरकारांचा. केंद्रीय मंत्रालयातील तीस अधिकाऱ्यांचाही प्रतिनिधी मंडळात समावेश होता. विश्वविद्यालये, बँका व अन्य शासकीय संस्था यात हिंदीचा वापर वाढावा म्हणून अनेक पदे निर्माण केलेली आहेत. तेव्हा त्यांनाही जागतिक पर्यटनाची ही संधी म्हणजे एक अटळ पर्वणीच! हवीहवीशी आणि आनंददायक! अशा व्यक्तींसाठी प्रत्येकी ८५ हजार रुपयांची किमान तरतूद ही मंजुरीला पात्र होतीच. मात्र केवळ खासदार-राजकीय नेते-शासकीय व अन्य अधिकारी यांचीच उपस्थिती या संमेलनाला असते असे मानण्याचे कारण नाही. हिंदी भाषेत मोलाची भर टाकणारे साहित्यकारही या



संमेलनाला शोभा आणण्यासाठी आवश्यक असतात. त्यांचाही आवर्जून समावेश  केला जातो.

कमलेश्वर, गिरिराज किशोर, मुकुंद द्विवेदी, श्रीलाल शुक्ल, विद्यानिवास मिश्र, राजेश जोशी, चित्रा मुद्गल, मृदुला सिन्हा आदि साहित्यिकाच्या उपस्थितीने या संमेलनाला हिंदी संमेलनाचे स्वरूप लाभले; एरव्ही ते विश्वहिंदू संमेलनच ठरले असते.

यावर्षी ज्ञानपीठाचे मानकरी निर्मल वर्मा, अशोक बाजपेयी, केदारनाथ सिंह यांची नावे या संमेलनाच्या अधिकृत अतिथींमध्ये होती. परंतु त्यांनी या संमेलनाऐवजी पोलंड, जर्मनी आणि ह्ॉलंड या देशांचा दौरा करण्याची संधी साधून घेतली. बाजपेयी हे महात्मा गांधी इंटरनॅशनल हिंदी विद्यापीठाचे कुलगुरू आहेत; या आधी चार वर्षांपूर्वी झालेल्या लंडनच्या हिंदी संमेलनात त्यांची व्यवस्था नीट झालेली नव्हती, म्हणून त्यांनी सूरीनामला जाण्याचे टाळले. या संमेलनाचे आयोजन परराष्ट्र मंत्रालयातर्फे होते; आणि त्यात लेखककवींना फारसा वाव नसतो. परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यांना साहित्य अकादमी किंवा लेखक संघ यांच्याशी याबाबत काही संपर्क साधण्याची कधी गरज भासत नाही असा आजवरचा अनुभव आहे. यंदाही त्याचीच पुनरावृत्ती झाली.

विश्व हिंदी संमेलनाचा आरंभ १९७५ साली नागपूरमध्ये झाला तेव्हा त्यात साहित्यिक अनंत गोपाळ शेवडे प्रभृतींचा पुढाकार होता. महाराष्ट्र सरकारने त्यासाठी पंचवीस तीस लाख रुपयांची मदत दिली होती. त्यावेळचे महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांची कृपादृष्टी त्यावर होती. आमंत्रक संस्था होती वर्ध्याची राष्ट्रभाषा प्रचार समिती. पुढे या संमेलनांची जबाबदारी केंद्र सरकारने परराष्ट्र खात्याकडे सोपवली आणि खर्चासाठी पाच कोटींपर्यंत तरतूदही केली. त्यामुळे त्यावर आता सरकारी नोकरशहांची घट्ट पकड  आहे. परदेश प्रवासाची एक नामी संधी म्हणून हिंदी संमेलनाचा वापर करणे त्यांना फारच सोयीस्कर ठरावे-यात आश्चर्य कसले?

मॉरिशस, त्रिनिदाद येथेही या पूर्वी विश्व हिंदी संमेलनांचे आयोजन केले गेले होते. तेथे हिंदी  लोकांची संख्या बऱ्यापैकी आहे. सूरीनाम मध्येही हिंदी भोजपुरिया बोलणाऱ्या लोकांची मोठी वस्ती आहे. या देशातील भारतीय वंशाच्या लोकांना हिंदीच्या आधारे आपली अस्मिता व ओळख टिकवून धरणे क्रमप्राप्त ठरते. एक संघर्षाचे साधन म्हणून भाषेचा वापर करणे त्यांना भाग पडते. या वेळी भारतीय जनता पार्टी आणि रा. स्व. संघ यांच्या वतीने अनेक संघ समर्थकांना या संमेलनाला पाठवण्यात आले होते; तेथील मूळ भारतीय वांशिकांना एक नैतिक पाठबळ देण्यासाठी आणि तेथे हिंदी भाषिक ग्रंथालये, पुस्तक प्रदर्शने व परिसंवाद यांचा सिलसिला या संमेलनानंतरही चालू राहावा म्हणून संस्थात्मक पायावर काहीतरी करण्यासाठी चाचपणी करण्याची संघपरिवाराची योजना होती.

या संमेलनात हिंदीमधून वाङ्मयीन आणि अन्य माहितीचा ओघ चालू राहावा म्हणून वेबसाइटस तयार करण्याच्या दृष्टीने बरीच चर्चा झाली. देशादेशात हिंदी मधून आदानप्रदान व्हावे यावर भर देण्यात आला. ही या संमेलनाची एक मोठी फलश्रुती मानण्यात येते. सॉफ्टवेअर क्षेत्रातील तज्ज्ञांना त्यासाठी मुद्दाम आमंत्रित केले गेले होते. त्यामानाने साहित्यिकांना

त्यात कमी वावर मिळाला अशी तक्रारही अनेकांनी केली.

पुढचे संमेलन हॉलंडमध्ये घेण्यात येणार असे जाहीर करण्यात आले.सरकारी नोकरशाहीकडे कोणत्याही गोष्टीची सूत्रे गेली की जे काही होणार तेच विश्व हिंदी संमेलनाचे झालेले दिसते. परंतु सरकारी खजिन्यातून हिंदी भाषेच्या नावाने काही कोटी खर्ची पडतात. हजार पाचशे हिंदी लोकांना परदेश पर्यटनाची संधी मिळते, हिंदीच्या प्रचाराच्या निमित्ताने चार शब्द बोलता येतात, हेही काही कमी नाही. त्या त्या देशात हिंदीबद्दलची आत्मीयता व जाणही वाढण्यास या संमेलनाचा उपयोग होत असणारच! हिंदी भाषा व हिंदी साहित्य यांची काहीशी फारकत होत आहे ही गोष्ट मात्र चिंतेची आहे. भाजपा आणि संघपरिवार यांनी या हिंदी संमेलनांची सांगड बहुसंख्य समुदायाच्या राष्ट्रीय अस्मितेशी घालण्याचा प्रयत्न चालवलेला आहे हे या संमलनाने लक्षात आणून दिले. हिंदीला आंतरराष्ट्रीय भाषा बनवण्याचा हा संकल्प अर्थातच केवळ सरकारी आशीर्वादावर सिद्धीला जाणे सोपे नाही.

बावीस देशांतील ८० कोटी लोक बोलतात त्या हिंदी भाषेला संयुक्त राष्ट्रसंघात अधिकृत भाषा म्हणून स्वीकृत करणे, परदेशांमध्ये हिंदीच्या अध्ययनासाठी विद्यापीठातून अध्यासने सुरू करणे, माहिती तंत्रज्ञानाद्वारे परदेशात हिंदी भाषेचा प्रसार करणे याबद्दल या संमेलनात ठराव केले गेले.

या विश्व हिंदी संमेलनाला वर म्हटल्याप्रमाणे हिंदुत्ववादी रंग देण्याचा प्रयत्न झाला. पांचजन्यचे संपादक तरुण विजय यांनी एका परिसंवादाच्या वेळी कम्युनिस्ट पत्रकारांवर टीका करणाऱ्या लेखाच्या प्रती वाटल्या. तर अ. भा. प्रगतिशील लेखक संघाचे महासचिव कमला प्रसाद यांनी या संमेलनावर 'हिंदीच्या नावावर हिंदू संमेलन भरवण्याचा कट रचण्यात आला' असा आरोप केला. परंतु या संमेलनाला हिंदुत्वावादी वा अन्य कसलीच दिशा नव्हती असेही पत्रकार मधुकर उपाध्याय यांनी म्हटले. अशा वेगवेगळ्या प्रतिक्रियांवरून या संमेलनाच्या कार्यवाहीवर जो प्रकाश पडतो तो वाङ्मयीन निकोप आस्वादाला व प्रसादाला पोषक आहे असे म्हणणे अवघड ठरते.

काहीही असो, विश्व हिंदी संमेलनासारखे उपक्रम हे आवश्यक आहेत. आणि आपल्या मराठी जागतिक परिषदेलाही त्याद्वारे पुन्हा स्फूर्ती मिळायला हवी. वेगवेगळ्या देशात मराठी भाषक आज पसरलेले आहेत. त्या त्या देशात आपलीही संमेलने व्हायला हवीत. आपल्या भाषेचा, साहित्याचा, कलासंस्कृतीचा उचित उद्घोष व्हायला हवा. तेथील लोकांच्या अस्मितेलाही त्यामुळे बळ लाभेल. मराठी साहित्यात खूप काही घडत आहे आणि आपली माणसे आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर देशोदेशी नावलौकिक मिळवून चमकत आहेत. तेव्हा मराठीच्या जागतिकीकरणाची अधूनमधून अशी प्रचीती आपणही घेत राह्यला हवे आणि इतरांच्याही ते ध्यानी आणून द्यायला हवे. केवळ हिंदीची ती मिरास मानू नये.

-संपादक



# साहित्यवार्ता

**'रा. श्री. जोग हे न्याय देणारे समीक्षक'**

प्रा. रा. श्री. जोग हे न्याय देणारे समीक्षक होते, असे मत ज्येष्ठ समीक्षक मो. ग. धडफळे यांनी जोग यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. डॉ. हे. वि. इनामदार अध्यक्षस्थानी होते.

जोग यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा या वर्षीचा समीक्षा ग्रंथलेखाचा पुरस्कार म. सु. पाटील (मुंबई) यांना त्यांच्या 'इंदिरा यांचे काव्यविश्व' या समीक्षा ग्रंथासाठी देण्यात आला. हा ग्रंथ प्रकाशित करणारे अंमळनेर येथील चेतश्री प्रकाशनाचे वा. रा. सोनार यांना प्रकाशकासाठी असलेला पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या कन्या अनुराधा पोतदार यांनी स्वीकारला.

पुरस्काराचे हे सव्विसावे वर्ष आहे. समीक्षेसाठीचा पुरस्कार साडेतीन हजार रुपयांचा, तर प्रकाशकांसाठीचा पुरस्कार साडेसातशे रुपये व मानपत्र असा आहे.

डॉ. धडफळे म्हणाले, ''जोग हे संस्कृतची बैठक असलेले मराठीचे प्राध्यापक होते. व्याकरणाकडे त्यांचा अधिक ओढा होता. अलंकार हा शब्द त्यांना मान्य नव्हता. त्याऐवजी काव्यविभ्रम म्हणावे, असा त्यांचा आग्रह होता.''

वाचनाची आवड जोग यांच्यामुळे लागल्याचे पुरस्कारप्राप्त म. सु. पाटील यांनी सांगितले. त्यांचा विद्यार्थी नसलो तरी आमच्या संपूर्ण पिढीवर त्यांचे संस्कार झाले असल्याचे ते म्हणाले.

जोग यांचे 'पीएच. डी.चे विद्यार्थी प्रा. सुधाकर भोसले म्हणाले, ''त्यांच्याशी बोलताना एखाद्या ग्रंथाच्या अंतरंगात शिरल्यासारखे वाटे. त्यांच्याकडे अभिनिवेश नव्हता. आत्मचिंतन केल्याप्रमाणे ते बोलत असत.''

सरिता पदकी यांनी साहित्य सहकारातल्या जोग यांच्या आठवणी सांगितल्या त्या म्हणाल्या, ''फर्ग्युसनमधील विद्यार्थी, लेखक आणि कवींनी आपल्या वाङ्मयावर चर्चा करण्यासाठी स्थापन केलेल्या साहित्य सहकाराच्या सर्वच बैठकांना जोग उपस्थित राहत.''

विद्यार्थ्यांच्या भवितव्याची काळजी घेणारे जोग यांचे अनुभव डॉ. चंद्रशखर बर्वे यांनी कथन केले. जोग यांचे पुत्र अशोक जोग यांनी त्यांच्या घरच्या आठवणी सांगितल्या. ते म्हणाले, ''कुठल्याही प्राण्याला मारण्यासाठी नाखूश असलेले आपले वडील घरात पकडलेले उंदीरसुद्धा तलावात अलगद सोडून द्यायला लावीत होते. कपडे स्वच्छ आणि इस्त्री केले घालण्याची त्यांना सवय होती. फोटोग्राफी, चॉकलेट, आणि लॉरेल हार्डीचे चित्रपट पाहण्याची त्यांना आवड होती.''

व्यासंग, विश्लेषण आणि औचित्य यांचा जोग हे त्रिवेणी संगम होते. भौतिक शिस्त व

औचित्य यांचा मराठी साहित्यातले ते मानदंड होते, असे विचार प्रा. ग. प्र. प्रधान यांनी आपल्या लेखी भाषणात मांडले.

भावनातुर होण्याचा जोग यांचा स्वभाव नव्हता. याचा अर्थ ते संवेदनशील नव्हते, असा नाही. कारण गंभीर प्रसंगात ते व्याकुळ होत असल्याचा अनुभव आला होता, असे डॉ. गं. ना. जोगळेकर म्हणाले. पाठ्यपुस्तकांच्या बाहेरचेही शिकविणारे जोग भाषेसारखा रुक्ष विषय सुबोध करून शिकवायचे, असे डॉ. इनामदार यांनी सांगितले.

**भारतीय वाङ्‌मयाची त्रिमूर्ती**

भारतीय लेखकांनी पुन्हा एकदा साता समुद्रापार झेप घेतली आहे. बीबीसी या जागतिक प्रक्षेपण संस्थेने एक लाख ४० हजार वाचकांची मते आजमावून केलेल्या एका सर्वेक्षणानुसार जगातील सर्वात आवडत्या पहिल्या १०० कादंबरीकारांमध्ये तीन भारतीय लेखकांचा समावेश आहे. सलमान रश्दी, अरुंधती रॉय आणि विक्रम सेठ या तिघांच्या कादंबऱ्यांना जगातील वाचकांनी पसंतीची पावती दिली आहे. रश्दींची बहुचर्चित आणि वादग्रस्त 'मिडनाईट्स चिल्ड्रेन' आणि भारतीय प्रथा-परंपरांच्या प्रदीर्घ तपशिलाने भरलेली 'ए सुटेबल बॉय' या कादंबऱ्यांची नावे वाचकांनी लिहिली आहेत. या तीन लेखकापैकी रश्दी हे ज्येष्ठ आणि बहुचर्चित लेखक. त्यांच्या या कादंबरीच्या रंगमंचीय रूपाचाही नवा आविष्कार लंडनच्या रंगभूमीवर झाला आहे. विक्रम सेठ यांची 'ए सुटेबल बॉय' कादंबरी वेगळ्या अर्थाने भारताच्या प्रथा-परंपरांचा शोध घेणारी आहे. या कादंबरीचे मराठी रूपांतर अरुण साधू यांनी केले आहे. अरुंधती रॉय यांचा करिष्मा तर त्याच्या 'दि गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीला बुकर पुरस्कार मिळाल्यावर सर्वत्रच निर्माण झाला. या तिन्ही लेखकांचे भारतीयत्व हा त्यांच्या कादंबरी लेखनाचा मुख्य गाभा आहे. हे येथे मुद्दाम नोंदवले पाहिजे. रॉय यांच्या कादंबरात केरळ, तिथली माणसे, तिथला निसर्ग आणि धार्मिक ताणेबाणे कौशल्याने चित्रित केलेले दिसतात.

या निमित्ताने इंग्रजीतून लिहिणाऱ्या भारतीय लेखकांच्या जागतिक स्तरावरील सामर्थ्याचेच जणू दर्शन घडले आहे. विसाव्या शतकात गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर, निराद चौधरी, सरोजिनी नायडू, आर. के. नारायण, मनोहर माळगावकर, शशी देशपांडे याच्यासारख्या मान्यवरांचा ठसा उमटला. टागोरांच्या 'गीतांजली'ला नोबेल सन्मान तर लाभलाच; परंतु त्यांच्या कवितेचे चाहते आजही जगाच्या कानाकोपऱ्यात भेटत असतात. चौधरी, नारायण यांसारख्या ज्येष्ठांनी परदेशांतील समीक्षकांची, वाचकांची दाद आपल्या लेखनाने मिळवली आहे. भारतीय भाषकांचे साहित्य, इंग्रजीत गेले पाहिज, याचेही महत्त्व अशा प्रसंगी लक्षात येते.

**सकस लेखनासाठी विनोदबुद्धी आवश्यक**

जीवनातील लहानसहान गोष्टींकडे विनोदाने पहाण्याची दृष्टी लेखकाकडे असल्यावर कादंबरी अथवा कथा चांगली रंगते असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक प्रा. द. मा. मिरासदार यांनी केले. एकपात्री कलाकार अनिल पारगावकर यांनी लिहिलेल्या 'रसगुल्ले आणि तिरडी' या विनोदी कथासंग्रहाचे प्रकाशन प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते करण्यात आले. मराठीत चांगले विनोदी लेखन करणाऱ्या लेखकांची वाण आहे त्यामुळे गुणवत्तेच्या दृष्टीने विनोदी अशी पुस्तके कमी आहेत. जीवनातील लहानसहान अनुभवांकडे विनोदी दृष्टीने कसे पहावे व



त्याला विनोदाची झालर कशी द्यावी हे कोल्हटकरांकडून शिकण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे आचार्य अत्रे यांनी विनोदी लेखनाला वेगळे परिमाण दिले, असे विधान मिरासदार यांनी केले.

सिग्नेट पब्लिकेशनचे प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविक केले.

**माणूस साहित्यापासून दुरावल्यामुळे हिंसक वृत्ती वाढली : जावेद अख्तर**

''चांगले संस्कार घडण्यासाठी साहित्याची आवश्यकता असते. सध्या मात्र याची फारशी जाण कोणाला राहिलेली नाही. माणूस साहित्यापासून दूर गेल्याने समाजात हिंसक वृत्ती वाढत आहे,'' असे ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर यांनी सांगितले.

दहाव्या नवेदित मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते १९ मे रोजी झाले.

श्री. अख्तर म्हणाले, ''सध्या माणसाच्या मनातच एक प्रकारची विभाजनप्रक्रिया सुरू असून, याला शिक्षणव्यवस्थाही कारणीभूत ठरत आहे. पैसा मिळवणे एवढेच सध्या शिकवले जाते. साहित्याबद्दल प्रेम असलेली माणसे घडवण्याचे काम होताना दिसत नाही. साहित्य समजल्याशिवाय समाज, संस्कृती समजू शकत नाही; कारण सव्वा इतिहास साहित्यातच असतो. भाषांच्या भिंती दूर करून हे साहित्य लोकांपर्यंत पोचविण्याची आणि त्याद्वारे त्यांची मने सांधण्याची गरज आहे; मात्र सत्ताधाऱ्यांना याची फिकीर नाही. त्यामुळे लेखकांवर मोठी जबाबदारी असून, त्यांनी हे अंतर भरून काढण्यासाठी एकत्र यायला हवे.''

संमेलन म्हणजे फक्त जिवाभावांचे भेटणे नसून साहित्यविषयक संकल्पांचा सोहळा आहे, असे नमूद करून डॉ. पानतावणे म्हणाले, ''नव्या साहित्यिकांनी साहित्यक्षेत्रात येताना आत्मतृप्तीची पादत्राणे बाहेर ठेवून यावे. जिज्ञासेने विविध भारतीय भाषांतील वाङमय वाचावे. त्यामुळे आकलनकक्षा वाढण्यास मदत होईल. मराठी साहित्याचा वाचकवर्ग फार सीमित आहे. त्यामुळे आपले साहित्य सामान्यापर्यंत पोचण्यासाठी अभिरुची निर्माण करायला हवी.''

**भारतात महिला ग्रंथालय स्थापन करण्याची गरज**

'महिलांचे ग्रंथालय' ही संकल्पना इंग्लंडमध्ये चांगली रुजली आहे. त्याचा प्रसार अन्य देशांत केला जात आहे. महिलांच्या संघटना या ग्रंथालयात सक्रिय भाग घेत आहेत, अशी माहिती लंडन महानगर विद्यापीठातील महिला ग्रंथालयाच्या संचालिका अँटोनिया बाएट यांनी दिली.

ब्रिटिश ग्रंथालयातर्फे बाएट यांचे 'महिला ग्रंथालयाची निर्मिती' या विषयावर ९ जूनला व्याख्यान झाले. या वेळी त्यांनी इंग्लंडमधील या एकमेव महिला ग्रंथालयाबाबतची माहिती दिली. त्या म्हणाल्या, महिलांचे विविध प्रश्न, त्यांचा विकास, शिक्षण अशा अनेक विषयांची प्रचंड माहिती या ग्रंथालयात आहे. त्याचा लाभ इंग्लंडमधील अनेक महिला व स्वयंसेवी संस्था घेतात आणि विविध कार्यक्रमाची, शिक्षणाची आखणी करतात. या ग्रंथालयातील एकूण ज्ञान, माहितीसंपदा व त्याचा इंग्लंडमध्ये होत असलेला कार्यक्षम वापर याची माहिती बाएट यांनी दिली. अशा प्रकारच्या अनेक महिला ग्रंथालयांची जगभरात आवश्यकता असून भारतातही असे महिला ग्रंथालय निर्माण केले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ब्रिटिश ग्रंथालयाच्या ग्रंथपाल अनिल बक्षी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.

**न्यूजर्सी मध्ये विठ्ठल नाम हरी...**

वारकऱ्यांच्याच ढंगामधील तुकारामांचे अभंग ऐकून अगदी पंढरपूरमध्ये चंद्रभागेमध्ये

भक्तिरसात न्हाऊन निघाल्याचा भास होत आहे...

...ही आहे पुण्यामुंबईतील नव्हे, तर सातासमुद्रापलीकडील अमेरिकेतील न्यूजर्सी शहरामधील एका अमेरिकी नागरिकाची प्रतिक्रिया. अमेरिकी जनतेलाही विठ्ठल-रखुमाईच्या भक्तीमध्ये तल्लीन होण्याचा अनुभव देणारी ही किमया साधली आहे तमिळ भाषिक तुकाराम गणपथी यांनी.

त्यांची ही कीर्ती न्यूजर्सीतील मराठीविश्व या संस्थेपर्यंत पोचली. पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने त्याचे संहसयोजकत्व स्वीकारले. अमेरिकेतील भारतीय आणि तेथील स्थानिक, नागरिक, सर्वांनाच गणपथी यांचे अभंगगायन भावले.

वारकऱ्यांच्याच ढंगामध्ये गणपथी यांनी गायलेले तुकारामांचे अभंग ऐकून अगदी पंढरपूरमध्यें चंद्रभागेत भक्तिरसात न्हाहून निघाल्याचा भास होत आहे,' असे न्यूयॉर्कमधील डाना विल्किन्सन यांनी लिहिले आहे.

ह्यूस्टनच्या हरी अय्यर यांनी हे अभंगगायन ऐकून खऱ्या आनंदाची अनुभूती मिळाल्याचे म्हटले आहे. क्लीव्हलँडच्या मालथी रघुनाथ म्हणतात, 'भक्तीच्या संपन्न परंपरेचा दाखला देणारे पंधरा अभंग कथारूपामध्ये विणून गणपथी यांनी स्मरणीय अनुभव दिला. राग, आलाप अशा कोणत्याही तांत्रिकतेमध्ये न अडकता त्यांनी हा आनंद आमच्यापर्यंत पोचवला.'' या कार्यक्रमाची टेक्सास रेडिओनेही दखल घेतली. तुकाराम गणपथी यांच्या युरोप-अमेरिका दौऱ्याची सांगता ह्यूस्टनमधील कार्यक्रमाने झाली. त्यांनी लंडन, प्लोरिडा, डलास, न्यूयॉर्कमध्ये कार्यक्रम केले आहेत. क्लीव्हलँड येथील स्थानिक संगीत महोत्सवामध्येही गणपथी यांच्या कार्यक्रमाला स्थान देण्यात आले होते.

## 'सावरकर काव्य स्पर्धा ही भाषिक चळवळ!'

दौंडची स्वातंत्र्यवीर सावरकर काव्य स्पर्धा ही स्पर्धा नसून भाषिक चळवळ आहे, असे गौरवोद्गार फ. मुं. शिंदे यांनी काढले. अमरावतीचे कवी अरुण सांगोळे यांचा 'एका गोरज घडीला' हा काव्यसंग्रह या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरला.

फ. मुं. शिंदे म्हणाले, 'सूर्यफुलाचं बी कसंही पेरलं तरी सूर्यफुलाचं तोंड पूर्वेलाच असतं. कारण निष्ठा आणि श्रद्धा या गोष्टी मुळातच असाव्या लागतात. कवितेचंही तसंच आहे. कविता आधी काळजावर लिहिली जाते आणि मग कागदावर उतरते.'

परीक्षक डॉ. शंतनु चिंधडे म्हणाले, 'राज्याच्या कानाकोपऱ्यांतून १८८ कवी आणि ४१ काव्यसंग्रह या स्पर्धेसाठी आले होते.'

सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रह २००३ (रु.१००१) 'एका गोरज घडी' कवी- अरुण सांगोळे, अमरावती.

जयोस्तुते पुरस्कार - 'गीत विनायक' कवयित्री- सुषमा गरुड.

देशभक्तिपर काव्य- मुबारक शेख, सोलापूर.

बालकाव्य संग्रह- प्रज्ञेश मोळक, पुणे.

कविता : प्रथम क्रमांक (रोख रु. ५०१) प्रदीप गुजराथी, मनमाड.

द्वितीय क्रमांक - सुनील चौधरी, र. कृ. कुलकर्णी, नितीन भट.

तृतीय क्रमांक - सत्यपाल श्रीवास्तव, अरुण थोर.

उत्तेजनार्थ - शोभा जोशी, शांभवी बोधे, आय. के. शेख, डॉ. मीना भट्टड, अनिल हजारे,



सुनीता माने, प्रवीण होले, आकांक्षा देशपांडे, दिनकर कुलकर्णी, भारती देशपांडे.

## भारतीय लेखक, दिग्दर्शकांचे शिष्टमंडळ पाकिस्तानला जाणार

भारतातील लेखक, चित्रपट दिग्दर्शक, पत्रकार व राजनैतिक अधिकारी यांचा समावेश असलेले दहा जणांचे शिष्टमंडळ पाकिस्तानचा दौरा करणार आहे.

पंजाबी लेखिका अजित कौर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात भीष्म सहानी, सुनील दत्त, गुलजार, लेख टंडन, कुलदीप नय्यर, मुचकुंद दुबे यांचा समावेश आहे.

'सार्क लेखक व साहित्यिक प्रतिष्ठान'च्या अध्यक्षा कौर म्हणाल्या की पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत, यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी दोन्ही देशांत विश्वासाचे, सद्भावनेचे वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले लोकच हे काम करू शकतात.

## फाटका माणूस हा माझ्या लेखनाचा नायक : कांबळे

''परिस्थिती, फाटका माणूस माझ्या लेखनाचा विषय आहे. 'वाट तुडविताना' या पुस्तकाचा नायक ग्रंथ आहे,'' असे प्रतिपादन उत्तम कांबळे यांनी औरंगाबाद येथे केले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ वि. वि. चिपळूणकर यांच्या हस्ते यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

पुस्तकांचे जीवनातील महत्त्व विशद करताना ते म्हणाले, ''मी पुस्तके शोधत गेलो आणि स्वत:लाच शोधून गेलो. वाटचालीत पुस्तकांची संगत वाढत गेली, तसे जगण्याचे बळ वाढत गेले. खचून जाणे कमी झाले. आई एकटीच सांगत होती. ग्रंथ हजार रूपांनी सांगत होते.'' ''श्री. कांबळे यांचे लेखन मार्मिक, शक्तिशाली व सुंदर आहे. ते कवितेच्या उंचीपर्यंत जाऊन पोचते. दु:खाच्या एका प्रसंगातून उन्मळून न जाता ते एक माणूस म्हणून समोर येतात,'' असे भारत सासणे यांनी म्हटले.

## सावरकरांचे खरे विचार तरुण पिढीपर्यंत पोहोचणे गरजेचे- मोरे

स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी विपर्यस्त लेखन करणाऱ्या तथाकथित विचारवंतांचा प्रतिवाद सावरकरांचे भक्तही करत नाहीत, हे महाराष्ट्रातील वैचारिक दिवाळखोरीचे लक्षण असून, सावरकरांचे खरे विचार तरुण पिढीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. शेषराव मोरे यांनी व्यक्त केले.

दिवंगत शास्त्रज्ञ अनंतराव सुर्वे यांच्या स्मरणार्थ पुणे मराठी ग्रंथालयाचा पाच हजार रुपयांचा 'सावरकर पुरस्कार' सुबोध जावडेकर यांना हसरं विज्ञान या पुस्तकाबद्दल सावरकरांच्या जन्मदिनी प्रा. मोरे यांच्या हस्ते देण्यात आला.

सावरकरांच्या देशभक्तीबद्दल सध्या शंका घेतली जात असताना महाराष्ट्रातील विचारवंत शांत बसले आहेत, ही एक प्रकारची वैचारिक गुन्हेगारी आहे, असे सांगून प्रा. मोरे म्हणाले की, हिंदुत्वनिष्ठ माणूस विज्ञाननिष्ठ असू शकत नाही, तो सनातनीच असतो हे पटवून देण्याचे कारस्थान मार्क्सवादी, समाजवादी विचारांची मंडळी करीत आहेत. सावरकरांची विज्ञाननिष्ठा खोटी असल्याचा अपप्रचार त्यांच्यामार्फत केला जात आहे.

सावरकर हे अनुवंशवादी असल्याच्या पूर्वग्रहातूनच सावरकरांविषयीचे संशोधन केले गेल्यामुळे या संशोधन ग्रंथाचा अभ्यास करणाऱ्यांच्या मनात सावरकरांची चुकीची प्रतिमा निर्माण होत असल्याबद्दल प्रा. मोरे यांनी खंत व्यक्त केली.

कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसलेले हिंदुराष्ट्र सावरकरांना अभिप्रेत होते. परंतु त्यांचा बुद्धिप्रामाण्यवाद आजही लोकांना समजू शकत नाही. असेही प्रा. मोरे म्हणाले.

जावडेकर म्हणाले की, विज्ञानसाहित्य ही वाङ्मयाची शाखा असून, विज्ञानाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम चित्रित करण्याचे काम विज्ञानसाहित्य करते. त्यामुळे साहित्याच्या निकषावर विज्ञानकथेचे मूल्यमापन झाले पाहिजे.

**भव्य स्वप्न देण्यात साहित्य अयशस्वी ठरल्यास समाज उठून उभा राहात नाही**

हतबल झालेल्या आणि पतित होऊन घडलेल्या मानवसमूहाला मुक्तीचे आणि प्रगतीचे भव्य स्वप्न देणे हे साहित्याचे कार्य आहे. भव्य स्वप्न देण्यात साहित्य अयशस्वी ठरले तर समाज व देश उठून उभा राहात नाही असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी सोलापूर जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केले.

सोलापूर जिल्हा साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. रं. बोराडे यांच्या हस्ते झाले.

आजचा साहित्यिक स्वत:वरील विश्वास गमावून बसलेला दिसतो. आजूबाजूच्या परिस्थितीने वैफल्याने त्याला ग्रासले आह. परिस्थितीवर मात करायला लावणारी मंत्राक्षरे साहित्यिकांनीच उच्चारली पाहिजेत. वर्तमान काळातील उदासीनता आणि क्रियाशून्यता नष्ट करण्यासाठी साहित्यानेच पुढाकार घेतला पाहिजे, असे डॉ. फडकुले म्हणाले.

भूक, दारिद्र्य, लाचारी, अश्रू, शोषण आणि विषमता याचे चित्रण साहित्यात होत असले तरी शेतकरी, कामकरी, दलित यांच्यावर होणारे आक्रमण व त्यांचे उद्‌ध्वस्त होणारे आयुष्य साहित्यातून अजून प्रभावाने दिसत नाही. आदिवासी आणि ग्रामीण भागातील कनिष्ठ स्तराची फरफट अजून साहित्यात प्रकट झाली नाही, असे निरीक्षणही त्यांनी मांडले.

जेव्हा प्रज्ञा आणि प्रतिभा राजसत्तेसमोर दासीसारखी उभी राहतात तेव्हा साहित्य आणि संस्कृती दोहोंचाही अध:पात होण्याला वेळ लागत नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

सोलापूर जिल्ह्याची साहित्य परंपरा मोठी असूनही वाङ्मयीन तोंडवळा लोकांसमोर आला नाही, असे मत रा. रं. बोराडे यांनी व्यक्त केले. आजूबाजूच्या भीषण समस्या साहित्यात यायला हव्यात. तसे न झाल्यास वाचक साहित्य हातात धरणार नाही असे बोराडे यांनी म्हटले.

ग्रामीण भागातील लेखकांना बळ देण्यासाठी जिल्हास्तरीय साहित्य संमेलने आवश्यक असल्याचे मत डॉ. द. ता. भोसले यांनी मांडले. स्वागताध्यक्ष विवेक घळसासी यांनी समाजाला लागलेले ग्रहण साहित्यिकांनी दूर करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. दत्ता हलसगीकर यांनी प्रास्ताविक केले. लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी आभार मानले.

सकाळी कवी कुंजविहारी यांच्या निवासस्थानापूसन संमेलनस्थळापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. पालखीत ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यांची कन्नड वचने, तेलगु, उर्दू या भाषेतील ग्रंथ डॉ. आंबेडकर व जैन धर्म तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ ठेवण्यात आले होते. संमेलनानिमित्त ग्रंथप्रदर्शनही भरविण्यात आले होते. चित्रकार नागेश सुरवसे यांनी जिल्ह्यातील कवींच्या कवितांवर काढलेली काव्यचित्रे हे रसिकांसाठी आकर्षण ठरले.

दुपारच्या सत्रात प्रा. श्रीराम पुजारी यांच्या अध्यक्षतेखाली 'साहित्याकडून आम्हाला काय हवे' या विषयावर परिसंवाद झाला. दत्ता गायकवाड, प्रा. प्रज्ञा देशपांडे, डॉ. दत्तात्रय थोरे आदींनी भाग घेतला. साहित्य वास्तववादी असावे, माणूस हा केंद्रबिंदू असावा, आजूबाजूचे प्रश्न



साहित्यात यावेत, साहित्याने माणसाला दिशा द्यावी, अस्थिरता व अस्वस्थता या प्रश्नांसंबंधी विचार व्हावा अशी अपेक्षा वक्त्यांनी व्यक्त केली. प्रा. श्रीराम पुजारी यांनी सर्व वक्त्यांनी विषयांतर केल्याचा शेरा मारला. साहित्यात फार क्वचित क्रांती करण्याची शक्ती असते, असे स्पष्ट करताना मनाला श्रीमंत करणारे साहित्य हवे, अशी अपेक्षा पुजारी यांनी व्यक्त केली.

**'मोबाइलाधीनते'चा मनोविकार!**

जगात सर्वाधिक मोबाइल फोनधारक असलेल्या चीनमधील बहुसंख्य युवकांना 'मोबाइलवर अवलंबून राहण्या'चा नवा मानसिक विकारच जडल्याचे मत आहे. सतत चित्त विचलित राहणे आणि कामावर लक्ष एकाग्र करण्यास त्रास होणे ही या रोगाची लक्षणे आहेत.

या नव्या व्यसनाधीनतेने स्मरणशक्तीचा वापर करण्याबाबतही आळस निर्माण केला आहे. मोबाइल अवलंबित्वाच्या बहुतेक 'मनोरुग्णां'ची समस्या, येणाऱ्या फोनची संख्या घटल्यावरच लक्षात येते. शहरी धकाधकीपासून दूर नेणाऱ्या गिर्यारोहण, निसर्गभ्रमण यांसारख्या क्रीडाप्रकारांत किंवा वाचनात मन रमविणे आणि मोबाइल फोनला आपल्या आयुष्याचा भाग न बनविणे हे या समस्येवरचे उपाय असल्याचे यांग लिंग यांनी म्हटले आहे.

**संगीतक्षेत्रातील नामवंतांवर संदर्भ पुस्तिका**

बॉम्बे चार्टर्ड अकाऊन्टन्ट्स सोसायटी या संस्थेतील व्यावसायिकांनी संगीतक्षेत्रातील ३० दिग्गजांच्या जीवनकर्तृत्वाविषयी एक संदर्भपुस्तिका तयार केली आहे. १३ जून रोजी नेहरू सेंटरमध्ये उस्ताद अमदज अली खाँ यांच्या उपस्थितीत तिचे प्रकाशन झाले. सुमारे ८ हजार सदस्य असलेल्या बॉम्बे चार्टर्ड अकाउन्टन्ट्स सोसायटीच्या (बीसीएएस) संदर्भपुस्तिका दरवर्षी विविध कल्पनासूत्रातून साकारतात. यंदाची ही ४० वी संदर्भपुस्तिका किशोरी आमोणकर, पं. रविशंकर बिस्मिल्ला खाँ, पं. भीमसेन जोशी, पं. शिवकुमार शर्मा, झाकीर हुसेन, हरिप्रसाद चौरसिया, अमजद अली खाँ यावर मजकूर आहे.

**'पुलित्झर' पुरस्कारविजेत्या पत्रकाराची 'न्यूयॉर्क टाईम्स'मधून हकालपट्टी**

पुलित्झर पुरस्कार विजेत्या रिक ब्रॅग या पत्रकाराने अखेर 'न्यूयॉर्क टाईम्स' या वृत्तपत्राचा राजीनामा दिला. एका मुक्तपत्रकाराच्या प्रयत्नातून जमा झालेला माहितीच्या आधारावर लेख छापून त्याचे पूर्ण श्रेय स्वत:कडे घेण्यावरून ब्रॅग यांच्या राजीनाम्याची मागणी कंपनीने केली होती. ब्रॅग यांच्यावर यापूर्वीही वाङ्मयचौर्याचे आरोप झाले होते. त्याचबरोबर त्यांच्या बातमीत अनेकदा चुकाही असत. जून २००२ मध्ये 'फ्लोरिडा ऑयस्टारमेन' या लेखासाठी ब्रॅग याला वेस योडर या मुक्तपत्रकाराने बहुतांश माहिती पुरवली होती. त्यामुळे स्वत:च्या नावाबरोबरच ब्रॅगने योडरचेही नाव देणे आवश्यक असल्याचे टाइम्सने सांगितले. मात्र मुक्त पत्रकारांकडून माहिती घेऊन त्यांचे नाव न छापण्याचा शिरस्ताच असल्याचे सांगत एक पुस्तक लिहिण्याचा आपला विचार असून यासाठी आपणच टाइम्स सोडणार होतो, असा उलटा टोला ब्रॅगने मारला आहे.

**'विचारप्रधान क्षेत्रांची नासाडी थांबविणे हे विचारवंतांच्या हाती'**

क्षीण विचार लेखनाला प्रतिष्ठा मिळणे हे वैचारिक दारिद्र्याचे लक्षण असून अशा मरगळ आलेल्या वातावरणातच मानवी संवादाला आणि स्वास्थ्याला पायदळी तुडविणाऱ्या विचारांना क्रांतिकारकत्वाची पिसे डकविली जातात. त्यातून तोतया विचारवंतांचा जन्म होतो. विचारप्रधान

क्षेत्रांची नासाडी थांबविणे हे फक्त समतोल विचारवंतांच्या हाती आहे, असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. गंगाधर पानतवणे यांनी परभणी मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केले. संमेलनाचे उद्‌घाटन डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले.

डॉ. वाघमारे यांनी जागतिकीकरणाच्या परिणामांची चर्चा करून सांस्कृतिक-सामाजिक स्थितीचा वेध घेतला. अलीकडे मराठीत विचारप्रवण वाङ्‌मयाची निर्मिती थंडावल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. वाङ्‌मयीन अवस्थेत साचलेपण आल्यानंतर समांतर वाङ्‌मयीन चळवळ निर्माण होते, पण अशा समांतर साहित्याच्या चळवळीही मंदावत आहेत. नव्या बदलांना सामोरे जाऊन नव्या लेखकांनी वेगवेगळ्या क्षेत्रात संशोधन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. पानतावणे यांनी विचारप्रधान क्षेत्रे पुन्हा नव्याने निर्माण होण्याची गरज आहे असे म्हटले.

### 'पु. लं'च्या स्मरणार्थ उद्यान

पुणे महानगरपालिकेने दीड वर्षापूर्वी जाहीर केलेल्या महत्त्वाकांक्षी पु. ल. देशपांडे उद्यानाच्या कामास आता वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

सिंहगड रोडवर पंपिंग स्टेशन ते इलेक्ट्रिक सबस्टेशन या दरम्यान सुमारे ४० एकराच्या जमिनीवर महाराष्ट्राच्या या लाडक्या साहित्यिकाला एक कायमस्वरूपी श्रद्धांजली म्हणून हे उद्यान आकार घेत आहे. त्याला सात ते १० कोटी रुपये खर्च येणार आहे.

आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रवेशद्वार, आतमधील मुघल गार्डन, महाराष्ट्रातील कला आणि क्राफ्टस् यांचा मेळ साधणारे कलाग्राम विकसित केले जाणार आहे. येथे मराठी संस्कृतीचे दर्शन घडवणारी विविध प्रदर्शने भविष्यात आयोजित करण्यात येणार आहेत. या तिन्ही कामाचे लँडस्केप डिजाइन प्रसिद्ध निसर्ग भूरचनाकार शोभा भोपटकर यांनी केले आहे.

पुलंच्या प्रसन्न आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला अनुसरून या उद्यानाची रचना करण्यात येणार आहे. त्यात एक आकर्षक जॅपनीज गार्डन, तसेच विविध प्रकारची दुर्मिळ झाडे, मोठे 'फूड कोर्ट' तयार करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त येथील जुन्या मोठ्या झाडांवर मचाणं (झाडावरील घरं) बाधण्यात येणार आहेत. उद्यानाच्या नियोजित जागेवर सध्या सुमारे ३०० मोठी झाडे आहेत. ती न तोडता त्यांचा उपयोग या उद्यानासाठी करण्यात येणार आहे.

आतापर्यंत या जागेतील रस्त्याचे काम पूर्ण झाले असून तेथील चुन्याच्या भट्ट्या अन्यत्र हालवण्यात येणार आहेत. या उद्यानाच्या प्रवेशद्वाराजवळ पाण्याचा वापर करून एक आकर्षक आकृतिबंध तयार करण्यात येणार आहे. त्यामध्ये कारंजी तसेच धबधबेही असतील. पुलंप्रमाणेच कविवर्य वसंत बापट यांच्या नावाचे उद्यान प्रभात रोड आणि भांडारकर रोड परिसरात होत आहे.

### नीना कुलकर्णी यांच्या संवदेनशील मनाच्या भरारीचा 'अंतरंग'मध्ये प्रत्यय

लेखन करण्यासाठी भराऱ्या मारणाऱ्या मनाची आवश्यकता असून, 'अंतरंग' पुस्तकात नीना कुलकर्णी यांच्या संवेदनशील मनाने मारलेल्या भरारीचा प्रवास आहे असे 'लोकमत'चे समूह संपादक विजय कुवळेकर यांनी २८ मे रोजी सांगितले.



लोकसत्ता'च्या 'चतुरा' पुरवणीत कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'अंतरंग' या स्तंभाचे श्रीविद्या प्रकाशनने पुस्तक काढले आहे.

'अंतरंग' पुस्तकातील लिखाण नाटकातील कलावंताने लिहिले असले तरी ते नाटकी नसून पारदर्शी असल्याचे सांगितले. लेखन हा प्रांत नसतानाही नीना कुलकर्णी यांनी लिहिलेला स्तंभ वर्तमानपत्रात दीड वर्ष चालतो, हे लिखाणाचेच यश आहे. कारण वर्तमानपत्रात कुठलेही लिखाण लोकांना आवडले नाही तर लगेच बंद होत असते.

'लोकसत्ता'मध्ये 'अंतरंग' हे सदर लिहिताना त्या त्या वेळचे संदर्भ लक्षात घेऊन लिहिले होते. मात्र आज स्तंभाला पुस्तकाचे रूप प्राप्त झाल्यावरही तत्कालीन संदर्भ आणि निरीक्षण योग्य वाटत असल्याचे लेखिका कुलकर्णी यांनी सांगितले.

अभिनेते गिरीश ओक, अभिनेत्री रिमा लागू, नीना कुलकर्णी यांनी पुस्तकातील उताऱ्याचे अभिवाचन केले.

### 'गोनीदा' स्मृतिदिनानिमित्त दुर्गांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन

प्रसिद्ध साहित्यिक व दुर्गप्रेमी गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त इतिहासप्रेमी मंडळाच्या वतीने न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग सभागृहात भारतातील अपरिचित दुर्गांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन आयोचित केले आहे.

दुर्गतज्ज्ञ प्रा. प्र. के. घाणेकर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी ग्राहकपंचायतीचे संस्थापक बिंदूमाधव जोशी होते. श्री. जोशी या वेळी म्हणाले की, किल्ले म्हणजे देशभक्तीची प्रतीके आहेत. त्यांची विटंबना करणे हा सामाजिक गुन्हा आहे. तर प्रा. घाणेकर म्हणाले की, दुर्ग हे भारताचे वैभव आहे. पण आपण त्यांची दुर्दशा केली आहे. त्यांच्याबद्दल नव्या पिढीच्या मनात प्रेम निर्माण झाले तरच ही परिस्थिती बदलेल. मिलिंद क्षीरसागर यांनी भारतातील सर्व दुर्गांच्या माहितीचा कोश निर्माण होण्याची आवश्यकता स्पष्ट केली.

गो. नी. दांडेकर यांनी काढलेल्या काही दुर्मिळ छायाचित्रांसह प्रमोद मांडे, मिलिंद क्षीरसागर यांनी काढलेली अनेक अपरिचित दुर्गांची छायाचित्रे मांडली होती.

### आ. गडाख यांनी राजकारणात सुसंस्कृतपणा जोपासला : पवार

''यशवंतराव चव्हाणांनी दिलेल्या राजकारणात राहूनही सभ्यपणा व सुसंस्कृतपणा जोपासण्याच्या संदेशाचे यशवंतराव गडाख यांनी तंतोतंत पालन केले आहे. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या आत्मचरित्रात उमटले आहे,'' असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुणे येथे केले.

श्री. गडाख यांच्या 'अर्धविराम' या आत्मचरित्राचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत बाळासाहेब भारदे, उद्योगमंत्री पतंगराव कदम, ख्यातनाम दिग्दर्शक आणि कवी गुलजार, कवी दिलीप पुरुषात्तम चित्रे, पत्रकार अरुण साधू, 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर, आदी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या या प्रकाशन सोहळ्यास नगर जिल्ह्यातील

कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, ''राजकारणात राहूनही सभ्यपणा, सुसंस्कृतपणा सोडू नये, असा संदेश यशवंतराव चव्हाण यांनी दिला होता. तसा आदर्शही त्यांनी घालून दिला. चव्हाण यांनी राज्यभर कार्यकर्त्यांची फौजच तयार केली होती. गडाख हे या फौजेतील उमदे कार्यकर्ते आहेत. त्यांनी अत्यंत सुसंस्कृतपणे राजकारण केले. साहित्य, कला, संगीत यांच्याशी नाते जोडले. नगर जिल्ह्यातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तींची दखल पुस्तकरूपाने घेण्याची गरज होती. गडाख यांनी काही प्रमाणात हे काम केले आहे.''

श्री. शिंदे म्हणाले, ''आत्मचरित्रे किती प्रामाणिक असतात, याचा मला अंदाज नाही. पण, गडाख यांचे कार्य व राजकारण मी पाहिले आहे. आपल्या जीवनातील घडामोडी त्यांनी तितक्याच संवेदनशीलतेने आणि प्रामाणिकपणे आत्मचरित्रात मांडल्या आहेत. यश आणि अपयश या दोन्हीबद्दल त्यांनी तितक्याच तन्मयतेने लिहिले आहे. आत्मशोधच घेतला आहे. आत्मशोध घेतला की माणसे अपयशी होत नाहीत.''

राजकारणात राहूनही गडाख यांच्यातील सामाजिक व राजकीय संवेदनक्षमता बोथट झाली नाही हे या आत्मचरित्रावरून पुन्हा एकदा जाणवले, असे श्री. चित्रे यांनी नमूद कले. गडाख यांच्या आत्मचरित्राचा हिंदीतून अनुवाद करण्याची अपेक्षा गुलजार यांनी व्यक्त केली.लोकशाही सुदृढ होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी आत्मचरित्रपर लिखाण करण्याची गरज केतकर यांनी व्यक्त केली. श्री. साधू म्हणाले, ''भारतात लोकांच्या अपेक्षांचे ओझे बाळगत काही राजकारणी रचनात्मक कार्य करीत असतात. गडाख हे अशांपैकी एक आहेत.''

श्री. गडाख म्हणाले, ''कोणतीही पार्श्वभूमी नसताना मी राजकारणात आलो आणि स्थिरावलो. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पिढीतील मी कार्यकर्ता आहे. महाराष्ट्राच्या नवनिर्मितीचा काळ पाहिला, त्यात भागही घेतला. आत्मचरित्रात ते मांडले आहे. ते वाचताना राजकीय कार्यकर्त्यांना स्वत:लाच आरशात पाहिल्यासारखे वाटले.''

**सर्जनशील भाषेचा शोध घेण्याची साधना : पाडगावकर**

''माणूस सुखी होतो म्हणजे काय होते? तो दु:खी का होतो? त्याला एकाकीपण का येते? तो प्रेम करतो अन् त्याचं क्रौर्यही दिसतं.... मला हे सारं सारं समजून घ्यायचं असतं. जीवनाच्या या नानाविध अनुभवांचं गाणं करायचं असतं,... 'कवी मंगेश पाडगावकर यांनी आपल्याला कविता का लिहावीशी वाटते हे विशद करताना असे उद्गार काढले.

कवितेवर नितांत प्रेम करणाऱ्या शांत शेळके यांच्या पहिल्या स्मृतिदिनी शांताबाईंचे स्मरण करताना पाडगावकरांनी काव्यमैफल रंगवली. डॉ. अरुणा ढेरे यांनी पाडगावकरांशी संवाद केला.

श्री. पाडगावकर म्हणाले, ''व्यास आणि शेक्सपिअर हे सर्जनशील साक्षित्व आहेत. त्यांनी कितीतरी पात्रे निर्माण केली, पण त्यात ते कुठेही नाहीत. स्वत:ला पूर्ण बाजूला ठेवून आयुष्याचा शोध घ्यायला जमले पाहिजे. एक कवी म्हणून जीवनानुभवाच्या संदर्भात सर्जनशील भाषेचा शोध घेण्याची साधना मी करीत आहे. प्रत्येक अनुभव स्वत:चा शोध घेण्याचे आवाहन करीत येतो. त्या अनुभवाला त्याचे रूप, त्याचा सूर हवा असतो. मी तो शोध घेत जातो आणि कविता वेगवेगळी बनत जात. अमुक एका जातीची कविता हीच शुद्ध कविता यावर माझा



अजिबात विश्वास नाही. त्या त्या अनुभवाला त्याचा आवाज मिळवून देण्याचा अखंड प्रयत्न करणे ही कवीची साधना असते.''

ते म्हणाले, ''माणूस आपले मोठेपण दुसऱ्याच्या डोळ्यात पाहतो आणि तो महत्त्वाकांक्षी असतो. कलावंतही याला अपवाद नसतो. या गोष्टी त्याच्या कवी म्हणून साधनेच्या आड येतात. स्वत:च्या आत पाहण्याचा अनुभव हा साक्षात्कार असतो. तो अनुभव आत्ता आत्ता कधीतरी येऊ लागला आहे. अशा वेळी दुसऱ्याच्या सुखदु:खाचे गाणे सुचू लागते. हे सारे मला लिहायचे असते. फूटपट्टी घेऊन गाणं मापता येत नाही, द्वेष करून गाणं शापता येत नाही.''

**संगीत सरावासाठी सोपी पद्धत विकसित केल्याचा दावा**

संगीताचे शिक्षण घेण्यास सुरवात केलेल्या लोकांसाठी मुंबईचे चंद्रकांत करंदीकर यांनी स्वरांचा सराव करण्याची 'करंदीकर पॅटर्न' नावाची सोपी पद्धत तयार केली आहे. त्यावर आधारित स्वरांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी 'रियाजाची सोपी पद्धत' नावाची छोटी पुस्तिकाही त्यांनी प्रकाशित केली आहे.

या पद्धतीची माहिती श्री. करंदीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. अरविंद वाकणकर यांच्याकडे दोन वर्षे संगीताचा सराव करताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून ही पद्धत विकसित केली. या पद्धतीनुसार सराव केल्यास सहा ते बारा महिन्यांत त्यांची चांगली ओळख होते. कोणत्याही वेळी व ठिकाणी या पद्धतीप्रमाणे सराव करता येतो.''

**विज्ञानकथांतील गोष्टी प्रत्यक्षातही येतील : डॉ. नारळीकर**

''विज्ञानकथा ही भविष्यदर्शी असते. आपण अशा कालखंडात जगत आहोत, ज्यात आताच्या विज्ञानकथेत मांडलेल्या गोष्टी भविष्यात आपल्याला जगाव्याही लागतील. त्यादृष्टीने विज्ञानकथांना बराच वाव असून, चांगल्या विज्ञानकथा लिहिल्या गेल्या पाहिजेत,'' अशी अपेक्षा ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि 'आयुका'चे संचालक डॉ. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केली.

ज्योतिर्विद्या परिसंस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'विज्ञानकथांचे विश्व' या विषयावर ते बोलत होते. 'आयुका'चे नियोजित संचालक डॉ. नरेश दधीच, संस्थेचे अध्यक्ष सुहास गुर्जर आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. नारळीकर विज्ञानकथांविषयी आपला दृष्टिकोन मांडताना म्हणाले, ''विज्ञानकथांनी कल्पनारम्य असूनही वास्तविक आहेत, अशी अनुभूती वाचकाला द्यायला हवी. मात्र त्या भयकथा किंवा रहस्यकथा नसाव्यात. त्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या शक्तीचे परिणाम समाजावर होत असतात. भविष्यात हे परिणाम कसे असतील, याचा वेध विज्ञानकथांतून घेतला गेला पाहिजे.''

आपल्या 'धूमकेतू' या कथेचा संदर्भ देत ते म्हणाले, ''यामध्ये एक धूमकेतू पृथ्वीवर आदळणार अशी कल्पना करून ही धडक वाचवण्यासाठी शास्त्रज्ञ काय करतात, याचे चित्रण आहे. या कथेनंतर पंधरा-वीस वर्षांनंतर 'नासा'ने धूमकेतूची धडक टाळण्यासाठी कथेत असलेल्या पद्धतीसारखीच पद्धत मांडली. 'पुत्रवती भव' या कथेत अंधश्रद्धा आणि विज्ञान यातील संघर्ष होता.''

''विज्ञानकथांची तुलना ऐतिहासिक कादंबऱ्यांशी करता येऊ शकेल,'' असे नमूद करून ते म्हणाले, ''दोन्हीमध्ये काही काल्पनिक व काही वास्तव व्यक्तिरेखांचे चित्रण असते. मात्र,

विज्ञानात वैज्ञानिक तथ्य असावे लागते. काही विज्ञानकथा अशाही आहेत; ज्यातील मूळ संकल्पनाच चुकीच्या आहेत. अशा काही कथा विद्यार्थ्यांना सांगून त्यातील चूक त्यांना शोधून काढायला लावणे हाही एक चांगला अभ्यास ठरू शकेल.''

**'सार्स' विषाणू पृथ्वीबाहेरचे?**

'सार्स'चे विषाणू पृथ्वीबाहेरील वातावरणातून पृथ्वीवर आले असावेत, असा एक तर्क आहे, असे डॉ. नारळीकर यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. ते म्हणाले, ''पृथ्वीबाहेरील वातावरणात जिवाणू असू शकतील असा एक तर्क आहे. हे जिवाणू धूमकेतूच्या शेपटीतून पृथ्वीच्या वातावरणात येऊ शकतात. जीवाणूंप्रमाणेच तेथे विषाणूही असावेत. 'सार्स'च्या बाबतीत हिमालयातील वातावरणाच्या थरातून या विषाणूंना पृथ्वीवर येण्यास अनुकूलता मिळाली असावी. त्यामुळे हा रोग चीनमध्ये पसरला असावा, अशी शक्यता चंद्रा विक्रमसिंघे, मिल्टन व मी काही निरीक्षणांती मांडली. त्याच्या पुष्टीसाठी आणखी काही प्रयोग करणे आवश्यक आहे.''

**सुनीताबाईंच्या काव्यवाचनाने रसिक मंत्रमुग्ध**

चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा
का बरं आलास आज स्वप्नात?
तेंव्हाच तर आपलं नव्हतं का ठरलं?
दु:ख नाही उरलं आता मनात....

सुनीताबाईं देशपांडे यांनी पद्मा गोळे यांची ही कविता सादर केली आणि अंगावरचे रोमांच टाळ्यांचे रूप घेऊन प्रेक्षागृहात उमटले.

आशय सांस्कृतिक व पाथफाइंडर आयोजित पु. ल. स्मृती महोत्सवात सुनीताबाईंच्या कवितांच्या अभिवाचनाच्या ध्वनिचित्रफितीचे प्रकाशन मुंबईचे नगरपाल किरण शांताराम यांच्या हस्ते १३ जून रोजी करण्यात आले.

सुनीताबाईनी या कार्यक्रमात गोविंदाग्रज, बा. सी. मर्ढेकर, आरती प्रभू, बा. भ. बोरकर, पद्मा गोळे यांच्या कविता सादर केल्या. राम गणेश गडकऱ्यांच्या तीनही रूपांचे दर्शन रसिकांना घडावे म्हणून पु. ल. व सुनीताबाईंनी त्यांच्या कवितावाचनाचे कार्यक्रम करण्यास सुरवात केली, याची आठवण सांगून त्यांची 'मंगल देशा, पवित्र देशा' ही कविता सादर केली.

मर्ढेकरांच्या 'या दु:खाच्या कढईची गा, अशीच देवा घडण असू दे...' या कवितेतील मागणे त्यांनी जितक्या कणखरपणे व्यक्त केले, तितक्याच नाजूकपणे 'दवात आलीस भल्या पहाटे, शुक्राच्या तोऱ्यात एकदा....' 'पोरसवादा होतीस काल परवा पावेतो....', सादर केली.

'असे काहीतरी व्हावे अशी होती दाट इच्छा, असे काहीतरी झाले पुरविते तेच पिच्छा...' मधली अगतिकता तेवढ्याच सामर्थ्याने व्यक्त केली, 'फलाटदादा फलाटदादा' या कवितेतील 'बोला ना फलाटदादा' म्हणत केलेले आर्जव ऐकून खरंच आता फलाटदादा देखील बोलेल असेच वाटून गेले.

कवी चिं. त्र्यं. खानोलकर उर्फ आरती प्रभूंची कोकणातील गोष्ट सांगत, त्यांच्या कविता त्यांच्या खानावळीत येणाऱ्यांनी हळूच नेऊन मौज प्रकाशनाकडे कशा पाठवल्या आणि त्या तीन चार महिने छापून न आल्यावर आरती प्रभू हे नाव कसे मिळाले, हा किस्साही त्यांनी



अत्यंत खुमासदार शैलीत सांगितला. या प्रसिद्धीमुळे आपण कुणीतरी अद्वितीय आहोत, असा अहंकार आपल्यात निर्माण होण्याची भीती खानोलकर यांना वाटली आणि कविता सुचली, 'येरे घना येरे घना, न्हाऊ घाल माझ्या मना....!' बाई येथे सांगून जातात, 'ते केवळ धुऊन काढ नाही म्हणत, आईच्या मायेने न्हाऊ घाल, असे प्रभू घनास आळवितात. 'एका रिमझिम गाव, भासत आहे हृदयस्थ तान, पण...' या 'पण' मधील व्यकुळता, 'गेले द्यायचे राहून, तुझे नक्षत्रांचे देणे...' मधील अस्वस्थता सुनीताबाईंनी अत्यंत समर्थपणे व्यक्त केली.

बा. भ. बोरकरांच्या स्नेहामुळेच त्यांच्या कवितांचे वाचन आपण व भाई करत होतो, हे सांगून त्यांच्या आजारपणात त्यांना 'समुद्र बिलोरी ऐना...' ही कविता कशी ऐकवली हे सांगितल्यावर सगळेच भावुक होऊन गेले. त्यांच्या 'सरीवर सरी आल्या ग, सचैल गोपी न्हाल्या ग...' हवा पावसाळी, जरा रात्र काळी...' 'मी विझल्यावर त्या राखेवर...' कळत जाते तसे कसे जवळेचेही होतात दूर...' या कविता सादर केल्या.

या कार्यक्रमाच्या शेवटी सादर केलेल्या 'आता मी नसतेच इथे.....' या कवितेने सर्वांच्याच मनाला चटका लावला.

**महाकवी बेंद्रे, गोकाक यांनी भाषां भाषांमध्ये सेतू उभारला**

कर्नाटकातून पुण्यात स्थायिक झालेल्यांनी केलेल्या कामगिरीचे, संस्कृती संवर्धनाचे, तसेच कै. डॉ. कलमाडी श्यामराव यांच्या कार्याचे कौतुक करायला हवे. उभय राज्यांतील सांस्कृतिक बंध खूप घट्ट आहे. ''कन्नड महाकवी द. रा. बेंद्रे, शिवराम कारंथ, व्ही. के. गोकाक यांनी उभय भाषांदरम्यान सेतू उभारला. दोन्ही राज्यांतील वाद विसरून संस्कृती संवर्धनासाठी आपण पुन्हा एकदा एकत्र आले पाहिजे.'' असे मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी पुणे येथे कन्नड संघाच्या सुवर्ण महोत्सव सांगता समारंभात व्यक्त केले.

यावेळी कर्नाटकचे मुख्यमंत्री एस. एम. कृष्णा म्हणाले,

''महाराष्ट्राबद्दल आम्हाला कमालीचा आदर आहे. या राज्याने केलली प्रगती कौतुकास्पद आहे. कर्नाटक नेहमीच महाराष्ट्राच्या पावलावर पाऊल ठेवत आला आहे. महाराष्ट्रापेक्षा सरस कामगिरी करण्याच्या प्रयत्नात कर्नाटक आहे; पण सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने स्वत:चा ठसा निर्माण केला आहे. एक प्रगत व मोठे शहर म्हणून पुण्याचा उदय होत आहे; या शहराची क्षमता मोठी आहे.''

सीमाप्रश्नाचा उल्लेख करून म्हणाले, '' सीमेवरून किंवा पाण्याच्या मुद्द्यावरून देशात दुही निर्माण केली जात आहे. भाषा, सीमा, पाणी आदी मुद्दे उपस्थित करून लोकांच्या भावना भडकावणे सोपे असते. पण हे प्रश्न सामोपचाराने सोडवून देशाची एकता व अखंडता कायम ठेवणे गरजेचे आहे. कारण आपण सारे प्रथम भारतीय आहोत.''

कन्नड संघाच्या गणेशनगर येथील सांस्कृतिक सभागृहाचे दोन्ही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. या सभागृहासाठी २५ लाख रुपयांची देणगी कृष्णा यांनी जाहीर केली. बी. के. एस. अय्यंगार व यशोदा मोरे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**'प्रबोधनकार'चे प्रकाशन**

धर्मपाल कांबळे हे पुण्यात पोस्टखात्यात काम करतात; नोकरी सांभाळून त्यांनी बीएची पदवी मिळवली. त्यानंतर प्रबोधनकार ठाकरे यांच्यावर पुस्तक लिहिण्याचे ठरवून, सहासात

वर्षे सतत पाठपुरावा करून, 'प्रबोधनकार: व्यक्तित्व, कार्य व साहित्य' हे सहाशे पृष्ठांचे पुस्तक सिद्ध केले; आणि स्वत:च भांडवल घालून ते प्रसिद्धही केले आहे, ही उल्लेखनीय बाब आहे असे मत समीक्षक शंकर सारडा यांनी या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. श्री चित्तरंजन कोल्हटकर व श्री. माधव वझे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. उद्यानप्रसादमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला आमदार प्रकाश ढवळे, प्रा. रा. आ. कदम, निर्मलाताई केंढे वगैरे हजर होते.

धर्मपाल कांबळे यांनी प्रबोधनकारांच्या जीवनचरित्राचा शंभर पृष्ठात मागोवा घेतला असून, ठाकरे यांच्या लेखनाचा विस्तृत परिचय दिला आहे. त्यांच्या निवडक अग्रलेखांचे सारांश, सर्व पुस्तकांचे सारांश यामुळे प्रबोधनकारांच्या समग्र विचारप्रणालीचे संकलन या एकाच पुस्तकाद्वारे उपलब्ध करून वाचकांची मोठीच सोय केली आहे, या ग्रंथात कोठेही 'लेखक' डोकावत नाही; टीकाटिपणी केलेली नाही असे प्रा. रा. भा. कदम यांनी म्हटले. (संपर्क- सौ आम्रपाली कांबळे, बी २/७ पोस्टल कॉलनी , गुलटेकडी, पुणे- ३७. फोन - ४२६८४८८.)

### माणुसकी जिवंत ठेवणारे लोकच आदर्श बनावेत - अवचट

शीतपेयांच्या जाहिराती करणाऱ्या क्रिकेटपटू व फिल्मस्टार्सपेक्षा श्रेय कमी असलेल्या मतिमंद, अपंगांच्या क्षेत्रात काम करून माणुसकी जिवंत ठेवणारे लोकच समाजाचे आदर्श बनायला हवेत. असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, प्रतिभावंत लेखक डॉ. अनिल अवचट यांनी पुणे येथे व्यक्त केले. स्वरूपसेवा संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रौढ मतिमंदांसाठी कार्यरत असलेल्या मेधा टेंगशे यांना डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते, कोल्हापूरच्या सामाजिक कार्यकर्त्या नसीमा हुरजूक यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार देण्यात आले. जलतरणपटू केविन बोरा याच्यासह यशवंत खैरे, भाऊसाहेब जाधव, जयश्री फडके व हेमा हिरवे यांचाही सत्कार करण्यात आला.

सर्वत्र वैयक्तिक यशासाठी प्रसंगी ओरबाडून यश मिळवण्याची आत्मकेंद्री वृत्ती समाजात वाढत असताना माणुसकी जिवंत ठेवण्याचे कामच टेंगशे यांच्यासारखे लोक करीत आहेत. टेंगशे, हुरजूक व आज ज्यांचा सत्कार झाला ते सर्व लोक समाजाचे आदर्श असायला हवेत. त्याऐवजी माणसाच्या शरीराला अनावश्यक असलेल्या शीतपेयांच्या व मदिरेच्या जाहिराती करणारेच आज आदर्श झाले आहेत. वास्तविक, अपंग वा मतिमंद मुलांसाठी काम म्हणजे धारिष्ट्याची गोष्ट आहे. पण, ते हे लोक करीत आहेत. त्यामुळे तेच समाजाचे आदर्श असायला हवेत, असे अनिल अवचट यांनी म्हटले.

मतिमंद मुलांशी प्रेमाने वागले आणि त्यांचेही काही प्रश्न आहेत, या दृष्टीने त्यांच्यावर प्रेम केल्यास त्यांची भावनिक बुद्धिमत्ता नक्कीच वाढते, हेच साधना व्हिलेजच्या प्रयोगातून दिसून आले आहे आणि म्हणूनच या कार्याला मिळालेला पुरस्कार महत्त्वाचा आहे, असे मनोगत मेधा टेंगशे यांनी व्यक्त केले. धाक व दबावातून नव्हे तर प्रेमातून या कार्यात यश मिळू शकते. या मुलांना आहे तसे स्वीकारणे आणि त्यांना भावनिक विकासासाठी मदत करणे याद्वारे हे काम केले जाऊ शकते. असे केल्यास प्रौढ मतिमंद समाजात मिसळून वागू शकतात.

त्यांना वेगळे ठेवणे अयोग्य आहे. त्यासाठी पालकांचा दृष्टिकोनही सुधारण्याची गरज आहे. संयम, समजूतदारपणा आणि एकीकडे खूप लाड करतानाच दुसरीकडे उपेक्षेची वागणूक



दिली जाणार नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.''

व्यक्तींऐवजी संस्थांना पुरस्कार दिले जायला हवेत, अशी अपेक्षा नसीमा हुरजूक यांनी व्यक्त केली. अपंगांना व मतिमंदांनाही त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळेल, अशी वागणूक मिळायला हवी आणि पालकांनी एकत्र येऊन अशा संस्था सुरू करायला हव्यात, असे त्यांनी सुचवले.

### डॉ. सुनीती देशपांडे यांच्या यांच्या कथांतरचे प्रकाशन

डॉ. सुनीती देशपांडे यांनी मराठीत अनुवादित केलेल्या रशियन कथांच्या कथांतर या संग्रहाने मराठी साहित्यात अधिक मोलाची भर पडली असून त्यांच्या हातून अधिकाधिक साहित्यसेवा घडो असे उद्गार ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांनी काढले.

डॉ. सुनीती देशपांडे यांनी मराठी भाषेत अनुवादित केलेल्या कथांतर या रशियन कथासंग्रहाचे प्रकाशन गंगाधर गाडगीळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कल्चरल सेंटर ऑफ रशिया संस्थेचे संचालक डॉ. चेलिशेव, पत्रकार श्रीराम शिधये व मेहता पबिलशिंगचे संचालक सुनील मेहता उपस्थित होते. डॉ. सुनीती देशपांडे यांच्याविषयी गौरवोद्गार काढताना गंगाधर गाडगीळ म्हणाले, कथांतर हा संग्रह वाचताना आपण कुठेही अनुवाद वाचत आहोत असे वाटत नाही व हेच या पुस्तकाचे मोठेपण आहे.

संस्थेचे संचालक डॉ. चेलिशेव यावेळी बोलताना म्हणाले की, हिंदुस्थान-रशिया मैत्रीच्या इतिहासात कथांतर या पुस्तकाने एक नवे पान उघडले आहे. लेखिकेने या पुस्तकाद्वारे मराठी साहित्याची सेवा करून व दोन्ही देशांतील मैत्री वृद्धिंगत होण्यासाठी हातभार लावून दुहेरी भूमिका बजावली आहे.

महाराष्ट्र टाइम्सचे पत्रकार श्रीराम शिधये म्हणाले की, लेखिका सुनीती देशपांडे यांनी वापरलेली भाषा अलंकारिक व कृत्रिम नसून अतिशय साधी व सुंदर आहे, त्यामुळे वाचताना आपल्याला अनुवादाचा कुठेही भास होत नाही.

कथांतर हा कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी प्रकाशित केला असून याची प्रस्तुती कल्चरल सेंटर ऑफ रशिया यांची आहे.

### भारतीयांना धर्मांधतेने पोखरले आहे.....

भारतीयांना धर्मांधतेने पुरते पोखरले आहे, असे मत तहलका डॉट कॉमचे संपादक तरुण तेजपाल यांनी व्यक्त केले.

साधना साप्ताहिकाच्या संकल्प सोहळ्यानिमित्त आयोजित व्याख्यानात 'ध्येयवादी पत्रकारिता' या विषयावर ते बोलत होते. प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष न्यायमूर्ती पी. बी. सावंत अध्यक्षस्थानी होते.

देशाला भ्रष्टाचारीपेक्षाही धर्मांधतेचा धोका अधिक आहे. भारतीयांच्या मनात रुजत चाललेली ही धर्मांधता जाणीवेलाही पोखरते आहे, धार्मिकता हा तर आत्म्याला झालेला धोक्याविरुद्ध एकत्र लढण्याची गरज आहे, असेही तेजपाल म्हणाले.

सध्याच्या पत्रकारितेबद्दल निराशा व्यक्त करुन त्यांनी सांगितले की, देशात १९९० पर्यंत पत्रकारिता चांगली होती. वाहिन्या, वृत्तपत्रातील रंगीत पुरवण्या, यामुळे पत्रकारितेचा अंकुश हरवत गेला. जनसंपर्क, करमणूक आणि जाहिरात यांपेक्षा पत्रकारिता वेगळीच असायला हवी.

सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारत राहणारी यंत्रणा अस्तित्वात असल्याविना लोकशाही टिकूच शकत नाही हे लक्षात घ्यायला हवे असेही तेजपाल म्हणाले.

न्या. सावंत म्हणाले की, लोकशाहीवर अंकुश ठेवण्यासाठी आणि गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी पत्रकारितेची सुरवात झाली. तेजपाल यांनी संरक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार उघडकीस आणून कर्तव्यपूर्तीच केली आहे; ध्येयवादी पत्रकारिता समाजहिताची असावी याचेही भान पत्रकारांना असावे.

'साधना'चे संपादक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी प्रास्ताविकात 'साधना'च्या आजपर्यंतच्या कामगिरीचा आढावा घेतला. पन्नालाल सुराणा यांचेही यावेळी भाषण झाले.

**'पाचूचे मॉरिशस'चे प्रकाशन**

देशाचे भवितव्य घडविणारे मूलभूत प्रश्न आर्थिक नियोजन व परराष्ट्र धोरण याबाबतची जाणीव निर्माण करण्याचे फार मोठे आव्हान आहे, असे प्रतिपादन दैनिक 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी केले.

सातारा येथील ज्येष्ठ करसल्लागार व चित्रपट निर्माते अरुण गोडबोले यांनी लिहिलेल्या 'पाचूचे मॉरिशस, सोन्याची दुबई' व 'पगारातून आयकर कपात मार्गदर्शिका : २००३-४' या कौशिक प्रकाशनाच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन 'समर्थ सदन'मध्ये कुमार केतकर व राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री विलासराव पाटील उंडाळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर 'भारतापुढील आव्हाने' या विषयावर बोलताना आपल्या भाषणात केतकर पुढे म्हणाले की, आपल्या राष्ट्रासमोर आव्हान आहे, याची कुणाला पर्वा नाही. हेच सर्वात मोठे आव्हान आहे. लोकसभा, विधानसभा, त्याचबरोबर वृत्तपत्र व टेलिव्हिजनवर याबाबत गंभीरपणे चर्चा अजिबात होताना दिसत नाही.

**बेनझिरची कविता**

'माझ्या शत्रूंना वाटतं मी कधीच जन्माला यायला नको होतं, त्यांच्यासाठी ही जणू एक दुःखाची नि शरमेची बाब आहे, की एका मुस्लीम देशावर राज्य करणारी मी पहिली स्त्री, बनते, शतकानुशतकांच्या पुरुषी वर्चस्वाच्या तटबंदी कोसळून, विजयी वृत्तीने पुकार करते, स्त्री-पुरुष एकतेचा.'

ही कविता लिहिलीय पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान बेनझीर भुत्तो यांनी. आपलं दुःख आणि तरुंगवासात असलेल्या आपल्या पतीच्या हालअपेष्टांकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांना कवितेचा अधार घ्यावासा वाटला. तब्बल ३३९ ओळींची ही कविता बेनझीर यांनी आपल्या ५० व्या वाढदिवसानिमित्त लिहिली. आपल्या तीन मुलांसहित त्या सध्या दुबई येथे विजनवासात राहतात. तेथेच आयोजलेल्या एका समारंभात त्यांनी या कवितेचं वाचन केलं तेव्हा उपस्थितांचे डोळे अश्रूंनी डबडबले. पाकिस्तानात करावास कंठित असलेल्या आपल्या पतीची बातमी मिळावी म्हणून एका स्त्रीचा जीव कसा तीळतीळ तुटत होता याचं वर्णन या कवितेत आहे. राजकारण सोडल्यास आपले पती असिफ अली झरदारी यांची सुटका करण्यात येईल, असा प्रस्ताव आपल्यापुढे ठेवण्यात आला होता. पण आपण बाणेदारपणे तो नाकारला, असा गौप्यस्फोट बेनझीर यांनी यावेळी केला.



## अखिल भारतीय
## मराठी प्रकाशक संघ वृत्तान्त

केंद्र शासनातर्फे चित्रपट विषयक पुस्तकांना दिला जाणारा पुरस्कार यंदा 'दिलीपराज' प्रकाशनाच्या 'मौलिक चित्रपट गीते' या गंगाधर महांबरे यांनी संपादित केलेल्या पुस्तकाला मिळाला.

१३-२-२००३ रोजी दिल्लीमध्ये झालेल्या शानदार सोहळ्यात पुस्तकाचे प्रकाशक राजीव बर्वे आणि गंगाधर महांबरे यांना राष्ट्रपतींच्या हस्ते 'सुवर्ण कमला'ने सन्मानित करण्यात आले. या घटनेचा आनंद व्यक्त करण्यासाठी संघाने 'पाथफाइण्डर' मध्ये एक छोटासा कार्यक्रम आयोजित करून, संघाचे अध्यक्ष शरद गोगटे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन या दोघांचे अभिनंदन केले.


या वेळी बोलताना महांबरे यांनी हा पुरस्कार कसा दिला जातो, पुस्तकांची निवड कोण आणि कशी करते हे सांगितले. सर्व भारतीय भाषांतील पुस्तके स्पर्धेसाठी येतात. त्यांचे इंग्रजी भाषांतर करून मगच परीक्षक त्यांचे परीक्षण करून योग्य पुस्तकाची निवड करतात, 'ही निवड प्रक्रिया' पुस्तकाला खरा देणारी आहे.

दिल्लीतील पुरस्कार वितरण सोहळ्याविषयी बोलताना बर्वे यांनी -पुस्तके, लेखक, प्रकाशक यांच्या विषयी राष्ट्रपतींना आणि इतर पुरस्कार विजेत्यांना वाटणाऱ्या जिव्हाळ्याविषयी आलेली अनुभूती सांगितली. प्रकाशकांना ही गोष्ट निश्चितच आनंददायक वाटली.

**'एक्झोडस'चे लेखक लियॉन युरिस यांचे निधन**

इस्त्रायलच्या निर्मितीवरील 'एक्झोडस्' या जगभर विक्रीचे उच्चांक गाठलेल्या कादंबरीचे लेखक लियॉन युरिस यांचे गेल्या शनिवारी येथील शेल्टर आयलंडवरील घरी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते.

गेल्या शतकाच्या प्रारंभापासून १९४८ मध्ये इस्त्रायलची निर्मिती होईपर्यंतच्या काळातील युरोपमधील ज्यूंच्या स्थितीचे प्रत्ययकारी चित्रण करणारी ही कादंबरी १९५८ मध्ये प्रसिद्ध होताच अल्पावधीतच तिने जागतिक लोकप्रियता मिळविली. डझनभर भाषांतून तिचे अनुवाद झाले. रशियातील ज्यू समाजात तर त्यास धार्मिक ग्रंथाइतके महत्त्व प्राप्त झाले होते. एक्झोडसचा मराठी अनुवाद नुकताच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाला आहे.




# विज्ञान जमती

पुस्तक परिचय

## डॉ. अरुण मांडे


**विज्ञानाची गोडी वाढवणारे, अनुभव देणारे चौसष्ठ प्रयोग**

वीज, फोन, रेडिओ, टेलिव्हिजन, संगणक, इंटरनेट, म्युझिक सिस्टिम, मोटार , स्कूटर, विमान, लिफ्ट, चित्रपट- आज अशा कितीतरी गोष्टी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. दीडशे वर्षांपूर्वी या गोष्टींची माणसाला कल्पनाही करता येणे अवघड होते. आज त्या घरोघर पोचल्या आहेत. त्यांच्या शिवाय आपल्याला जगताही येणार नाही, अशी अवस्था आहे. या प्रत्येक गोष्टीच्या संशोधनामागे आणि निर्मितीमागे विज्ञानाची सूत्रे आहेत; तंत्रज्ञानातील सिद्धी आहेत. पंचमहाभूतांनी बनलेल्या या सृष्टीतील रहस्यांचा शोध घेत माणसाने ही मजल मारली आहे. काळ आणि अंतर यांच्यावर मात करण्यासाठी आपली बुद्धिमत्ता पणाला लावली आहे. निसर्गाच्या मर्यादांवर मात करण्याचा चंग बांधला आहे. कधी कधी त्याचा अतिरेकही माणूस करतो आहे. आर त्यातून पर्यावरणाचा विध्वंसही होतो आहे. अणुबाँबसारख्या संहारक अस्त्रांनी संपूर्ण मानवजातीचाच विनाश होण्याचीही भीषण शक्यता सर्वांनाच भेडसावते आहे.

....विज्ञानाचा हा सर्व प्रभाव आहे; आणि त्या विज्ञानाची मूलभूत माहिती आपल्याला हवी; आपल्या मुलाबाळांना हवी याबाबत कोणाच्याही मनात संदेह उरलेला नाही.

ही  पृथ्वी पंचमहाभूतांची बनलेली आहे; आणि येथील प्रत्येक वस्तूची निर्मिती पंचमहाभूतांच्याच आधारे झालेली आहे हे केवळ घोकून भागणार नाही. तशा पोपटपंचीतून आपल्या हाती फारसे काही लागलेले नाही. वर सांगितलेले बहुतेक शोध हे परदेशातील संशोधकांनी लावलेले आहेत; आणि त्याचे कारण म्हणजे पंचमहाभूतांचे त्यांचे आकलन हे केवळ पाठांतरातून सिद्ध झालेले नाही.  ते प्रयोगातून सिद्ध होत गेलेले आहे. मुलांना शाळेतच त्या दृष्टीने जे प्रयोग करायला मिळतात, त्यातून सृष्टीच्या रहस्यांचा उलगडा त्यांना होऊ





## विज्ञानाचे आकलन चांगल्या प्रकारे होण्यासाठी आपल्याकडे 'प्रयोगातून विज्ञान'अशा पुस्तकांचा वापर अधिकाधिक व्हायला हवा


लागतो, आणि त्यातून नव्या नव्या गोष्टींचा शोध लावण्यासाठी त्यांची प्रज्ञा सळसळू लागते.

विज्ञानाचे आकलन चांगल्या प्रकारे होण्यासाठी प्रयोगासारखा दुसरा मार्ग नाही. आपल्याकडे 'प्रयोगातून विज्ञान' समजावून देणाऱ्या पुस्तकांचा व साधनांचा वापर त्यामुळे अधिकाधिक व्हायला हवा. आपल्या शाळांमधले अभ्यासक्रम त्या दृष्टीने आखले जायला हवेत; आणि शाळांमधल्या प्रयोगशाळांमध्ये विद्यार्थ्यांना मुक्तपणे प्रयोग करण्यासाठी जास्तीत जास्त सोयी असायला हव्यात. भारताला विज्ञान-तंत्रज्ञानात येत्या दशकात, येत्या शतकात काही करून दाखवायचे असेल तर प्राथमिक- माध्यमिक शिक्षणकालात मुलामुलींना विज्ञानाच्या मूलभूत संकल्पनांचे ज्ञान प्रयोगाद्वारे व्यवस्थितपणे व्हायला हवे. यावर भर द्यायला हवा.

त्या दृष्टीने प्रयोगशाळांची व पाठ्यपुस्तकांची गरज आहे. पुस्तकविषयक गरज भागवणारी दोन नवी पुस्तके नुकतीच निघाली आहेत. विज्ञान गमती व विज्ञान जमती ही दोन छोटी पुस्तके डॉ. अरुण मांडे यांनी तयार केली आहेत. पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पंचमहाभूतांशी संबंधित गोष्टींवरचेच प्रयोग यात आहेत.

विज्ञान जमतीमध्ये एकूण ६४ प्रयोगांची माहिती आहे. हे प्रयोग कशाकशाबद्दल आहेत?

* विमान हवेत कसे उडते?
* ढगांमध्ये पाणी कुठून येतं?
* सिनेमाच्या पडद्यावर हलणारी चित्रे कशामुळे दिसतात?
* रंग आणि प्रकाशाचे परावर्तन यांचा काय संबंध आहे?
* इंद्रधनुष्याच्या रंगांची तबकडी जोरात फिरवली तर ती पांढरी का दिसते?
* हिरवं गवत हिरवंच का दिसतं?
* उन्हाळ्यामध्ये पांढऱ्या रंगाचे कपडे का घालावे?
* लोहचुंबकाकडे कोणत्या वस्तू आकर्षित होतात?
* तांबे हे उष्णतेचे उत्तम वाहक आहे का?
* रिकामी बाटली खरोखरच रिकामी असते का?
* तुमच्या फुफ्फुसांची ताकद किती?



**विज्ञानाद्वारे आपल्याला निसर्गातील विविध गोष्टींचा उलगडा होऊ शकतो. आणि त्याद्वारे नवनव्या वस्तूंची निर्मिती करता येते. जीवन अधिक सुसह्य करता येते.**

* उष्णतेमुळे हवेचे प्रसरण होते का?

* हवेला वजन असते का?

* हवा का वाहते?

* बर्फ पाण्यावर का तरंगतो?

* बाष्पीभवन म्हणजे काय?

* आंघोळ केल्यावर थंडी का वाजते?

* उष्णतेचा पाण्याच्या वजनावर काय परिणाम होतो?

* हिवाळ्यात लोकरीचे कपडे का वापरतात?

* पाणी उकळत असतानाही परीक्षा नळी हातात धरता येते का?

* श्वासावाटे आपण कार्बन-डाय-ऑक्साईड बाहेर सोडतो, हे कसे सिद्ध करता येते?

* कार्बन-डाय-ऑक्साइडमुळे आग विझते का?

* कार्बन-डाय-ऑक्साइड हा वायू हवेपेक्षा जड असतो का?

* इलेक्ट्रिक बल्बमधील तार का जळत नाही?

* कप्पीच्या सहाय्याने जड वस्तू कशी उचलली जाते?

* ज्वाला रंगीत का दिसतात?

* कॅमेऱ्याने आपण छायाचित्रे काढतो. असा कॅमेरा घरी तयार कसा करता येईल?

* गॅलिलिओने मनोऱ्यावर चढून जो प्रयोग केला, तो आपण आपल्या घरी करू शकू का?

विज्ञानाद्वारे आपल्याला निसर्गातील विविध गोष्टींचा उलगडा होऊ शकतो. आणि त्याद्वारे नवनव्या वस्तूंची निर्मिती करता येते. जीवन अधिक सुसह्य करता येते. त्यासाठी विज्ञानाची प्राथमिक व मूलभूत तत्त्वे नीट कळण्याची गरज आहे. 'विज्ञान जमती' या पुस्तकातले छोटे सोपे प्रयोग घरी करता येतील. छोट्या छोट्या प्रयोगातून मोठी सत्ये उलगडून समोर येतील. जिज्ञासू वृत्तीला चालना मिळेल.

**पृष्ठे : ९५ किंमत : ६० रु. सभासदांना : ४५ रु. पोस्टेज : २० रु.**






# विज्ञान गमती

## डॉ. अरुण मांडे

**विज्ञानातील मूलभूत नियम समजावून देणारे, लहान मुलांना सहज करता येतील असे विज्ञान प्रयोग**

'विज्ञान गमती' या पुस्तकातील प्रयोग उष्णता, हवा यांच्यावर आधारलेले आहेत. उदाहरणार्थ, उकळत्या पाण्यात बर्फ टाकला तर काय होईल? आपल्या सर्वांनाच या प्रश्नाचे उत्तर उष्णतेने बर्फ वितळून जाईल असे द्यावेसे वाटेल. परंतु ते उत्तर खरे नाही. परीक्षा नळीत पाऊण भाग पाणी घेऊन तिच्यात बर्फाचा तुकडा तार गुंडाळून नळीच्या तळाशी सोडा. नळी थोडी वाकडी करून पेटत्या मेणबत्तीवर पाण्याचा वरचा भाग तापवा. थोड्या वेळाने वरचे पाणी उकळू लागेल. पण तळाशी असलेला बर्फ वितळलेला नाही हे आपल्या लक्षात येईल.

थंड पाणी जड असतं, गरम पाणी हलकं असतं, या प्रयोगासाठीही उष्णतेची गरज असतेच. मेणबत्ती एका उथळ भांड्यात पाण्यात उभी ठेवून तिच्यावर दुधाची बाटली उलटी करून ठेवली तर बाटलीची मान पाण्यात बुडते. मेणबत्ती विझून गेल्यावर मात्र भांड्यातले पाणी बाटलीत चढू लागलेले दिसते. मेणबत्ती विझली याचे कारण बाटलीतला ऑक्सिजन संपला; बाटलीत पाणी शिरले याचे कारण बाटलीतील हवा पेटत्या मेणबत्तीमुळे गरम झालेली व प्रसरण पावलेली होती. मेणबत्ती विझल्यावर गरम झालेली हवा थंड झाल्याने आकुंचन पावली; आणि बाटलीत पोकळी निर्माण झाली. ती पोकळी भरून काढण्यासाठी पाणी वर चढले.

कार्बन डाय ऑक्साइड हा आगीचा शत्रू असतो. तो हवेपेक्षा जड असतो आणि जळती मेणबत्ती विझवतो.

याचप्रमाणे घरी करून पाहता येतील असे साधे सोपे गमतीचे अनेक प्रयोग या पुस्तकात आहेत, उदाहरार्थ,

* न तापवता पाणी ऊकळणे.



## हे छोटे छोटे प्रयोग म्हणजे पंचमहाभूतांच्या वापराचे एकेक रहस्य आहे. ते आत्मसात करा म्हणजे मग मोठे प्रयोग जमतील.

* कागदाच्या भांड्यात पाणी तापवणे
* खोलीमध्ये ढग निर्माण करणे
* वाफेवर चालणारी बोट तयार करणे
* उष्णतेमुळे लोखंड प्रसरण पावते हे दाखवणारा प्रयोग.
* स्टोव्हवर ठेवलेला पाण्यातून लगेच बुडबुडे आणणे.
* काचेच्या ग्लासमध्ये ड्रॉपरला खालीवर नाच करायला लावणे.
* हवेत एक पंचमांश भाग ऑक्सिजन असतो हे सिद्ध करणे
* पेटलेल्या उदबत्तीचा धूर हवेत वर जाण्याऐवजी खाली जाताना बघणे.
* न जळणारा कागद तयार करणे.
* मेणबत्तीच्या ज्योतीवर कागद ठेवून, त्याला जळू न देणे.
* डांबराच्या गोळ्यांना काचेच्या ग्लासमध्ये नाचायला लावणे
* काचेच्या भांड्यात रंगीत कारंजी तयार करणे
* बाटलीत फर्नची झाडे तयार करणे
* काचेच्या पेटीत वा ट्रेमध्ये रासायनिक बाग तयार करणे
* तेलावर पोहणारा मासा
* आपण कार्डबोर्ड कापतो त्याचप्रमाणे कात्रीने काच कापणे.


(हवेत कात्रीने काच कापता येत नाही. कारण कापताना जी कंपनं उठतात त्यामुळे काच तडकते. म्हणून हात, कात्री व पाण्याखाली ठेवून काच कापावी लागते.)

* आपोआप सोलणारं केळं.
* मेणबत्तीचा सी-सॉ तयार करणं.

हे छोटे छोटे प्रयोग म्हणजे पंचमहाभूतांच्या वापराचे एकेक रहस्य आहे. ते आत्मसात करा म्हणजे मग मोठे प्रयोग जमतील. या सृष्टीत ज्या गोष्टी आहेत त्या सर्व अशा प्रयोगांना वाव देणाऱ्या आहेत.

**पृष्ठे : ७३ किंमत : ५० रु. सभासदांना : ३८ रु. पोस्टेज : २० रु.**






# स्वतःचा शोध

**अनु. प्रज्ञा ओक**

**जीवन हा एक शाश्वत चमत्कार आहे शांततेच्या जादूनेच त्याचे दरवाजे खुले होतात.**

'स्वत:चा शोध' हे आचार्य रजनीश यांच्या 'दि न्यू डॉन' या पुस्तकाचे मराठी भाषांतर मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे बाजारात आले आहे.

या पुस्तकात ११ प्रकरणे आहेत. ओशो रजनीश हे रोज सकाळी आपल्या आश्रमात प्रवचने देत; आणि त्या प्रवचनांनाच नंतर पुस्तकरूप देत. एकेक विशिष्ट विषय घेऊन सलग दहा दिवस त्यावर प्रवचने दिली की त्या विषयावरील एकेका पुस्तकाचा ऐवज सिद्ध होई. अधूनमधून ते उपस्थित श्रोत्यांच्या व भक्तांच्या प्रश्नांनाही उत्तरे देत. त्या प्रश्नोत्तरांनाही पुस्तकरूपात पेश करीत. 'स्वत:चा शोध' मध्ये अशा प्रश्नोत्तरांचाच समावेश झालेला आहे.

या पुस्तकात आलेले प्रश्न हे प्रामुख्याने ध्यानधारणा, आध्यात्मिक अनुभवांच्या वेगवेगळ्या पातळ्या आणि त्यांचा साधकावर घडणारा परिणाम, माणसांची स्वभाव प्रकृती आणि वैशिष्ट्ये, मानवी मन, विनोद बुद्धी, पतिपत्नीसंबंधातील तणाव व त्यातून मुक्त होण्याचा मार्ग, मानवी नातेसंबंधातील कृत्रिमपणा व कंटाळवाणेपणा, एकाकीपणा आणि एकटेपणा, बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्ती, व्यवहारी जग आणि आध्यात्मिक जग, ध्यानधारणेमुळे जाणवणारे वेगळे वास्तव, असुरक्षिततेची भावना, गर्दीतला माणूस आणि एकान्तातला माणूस अशा संदर्भात विचारले गेलेले आहेत.

या प्रश्नोत्तरांच्या सत्रात विचारले गेलेले काही प्रश्न असे :

१. तुमचे प्रवचन ऐकल्यावर मनाची अवस्था एकदम वेगळ्या पातळीवर गेली. मी फार हलका पारदर्शक बनलो. मी एक सामान्य माणूस. असे आध्यात्मिक अनुभव मला पेलवतील का? त्यामुळे माझा मार्ग खरोखर बदलेल का?

२. मला येणारे अनुभव इतरांना सांगणे अवघड जाते. त्यावेळी नैराश्याचा झटका येतो. ध्यान धारणेमुळे आपल्याला लाभणारे समाधान- त्याची कल्पना शब्दांद्वारे इतरांपर्यंत पोचवणे शक्य आहे का?

३. मला या कम्युनमध्ये राहिल्यावर आलेले जे अनुभव आहेत, त्यामुळे आपण परिपक्व बनू शकू असे वाटू लागले आहे. इथल्या आश्रमात तुम्ही प्रेमाचा वर्षाव करीत असला तरी माझ्या मनात असे बाह्य जगाचे विचार का येतात?



## मनुष्य जसजसा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून प्रगत होत जातो तसतसा तो अंतरंगातील जग विसरायला लागतो.

४. तुमच्या सान्निध्यात आम्हाला दिव्य प्रकाशात न्हाऊन निघाल्याचा अनुभव येतो. त्यामुळे आपण नवीन व ताजे होत आहोत असे वाटते. आम्हाला हे जे वाटते ते खरे आहे की ती एक जादू आहे? साक्षात्कार घडल्याने असे अनुभव येतात का?

५. मी चार वर्षे आपल्या आश्रमातील झाझेन मेळाव्यात भाग घेत आहे. पण अजूनही माझा रागीटपणा कमी होत नाही. राग आला की स्वत:कडे त्रयस्थपणे पहा असे तुम्ही नेहमी सांगता . पण ते मला जमत नाही. त्रयस्थाच्या दृष्टिकोनातून बघणे कसे जमू शकेल?

६. गुरू-शिष्य यांच्यात भाषेविना संवाद होऊ शकतो का? माझी एक जपानी मैत्रीण तुमच्या इंग्लिश प्रवचनांना हजर राहते. तिला इंग्रजी येत नाही; पण तुम्ही जे सांगताय ते तिला चांगले समजते असे ती म्हणते. हे कसे शक्य आहे?

७. मी गेली बारा वर्षे संन्यासी म्हणून राहतोय. प्राप्तीपेक्षा खर्चच जास्त होत आला. त्यामुळे मी पुन्हा व्यवहारी जगात प्रवेश केला. आरोग्याचा विमा उतरवण्याचे मनात येते. संन्यासी म्हणून समाजात मानसिक ताणाशिवाय राहणं शक्य आहे का? असुरक्षित वातावणात सत्याच्या दृष्टीने विकास होणे संभवनीय आहे का?

८. मी गेली दोन वर्षे ध्यानधारणा करतो आहे. आता काही काही ध्वनी मला ऐकू येतात. लांबवरून येणाऱ्या समुद्राच्या लाटांच्या गाजेसारखे... ही पुढच्या प्रगाढ शांतीची सुरवात मानायची का?

९. मी आता माझ्या वडिलांच्या व्यवसायाची जबाबदारी उचलली आहे. पण गरज नसलेली मूल्ये सांभाळताना मनाला क्लेश होतात. व्यवसाय करतनाही अध्यात्मप्रवृत्ती टिकून राहील असा मार्ग सुचवू शकाल का?

१०. मला एकान्त आवडतो. पण कधीकधी एकाकी वाटते आणि ध्यानधारणेची मन:स्थिती नष्ट होते. एकाकीपणाकडून एकटेपणाकडे जाणे कसे जमू शकेल?

११. ध्यानधारणेत मी खोलवर जातो आहे, तसतशी मनाला नैराश्यभावना घेरते आहे. हे दडपण कमी कसे होऊ शकेल?

१२. हे दडपण दूर करण्यासाठी दैवी अतृप्तीच्या भावनेने मी स्वत:लाच हसण्याचा प्रयत्न करू पाहतो आहे. हास्यामुळे हे दडपण कमी होऊ शकेल का?

१३. जागरुकतेचा (अवेअरनेसचा) उगम कुठे होतो?

१४. मी ध्यानधारणा करतो. पण व्यवहारात इतरांबरोबर संबंध ठेवताना आपण सत्या पासून दूर जातोय या भावनेने गोंधळात पडतो. ध्यानधारणेमुळे हा गोंधळ तेवढ्यापुरता कमी होतो. पण मूळातून मार्ग सापडत नाही म्हणून अस्वस्थ असतो. अशावेळी मी काय करावे?

१५. तुमच्या सहवासात अद्भूत आनंद वाटतो. पण मनात अनेक अर्धवट प्रश्न घोटाळत राहतात. त्या अपूर्ण प्रश्नांना पूर्णत्व देण्यासाठी मी काय करायला हवे?

१६. सध्या तुमच्या सान्निध्यात पूर्वीसारखी प्रेमाची भावना मला जाणवत नाही, पण एक





## ज्या व्यक्तीवर एकेकाळी जीव तोडून प्रेम केले ती व्यक्ती तिरस्काराला तरी पात्र होऊ नये. प्रेमाचं रूपांतर तिरस्कारात होऊन प्रत्येक गोष्ट विषासमान वाटू नये.

प्रकारची मन:शांती मात्र जाणवते. प्रेम आणि शांती यात काय फरक आहे? प्रेम न जाणवताही शांती जाणवल्यामुळे मला दु:ख का वाटते?

१७. शेकडो वर्षे स्त्रियांना दडपले गेले. त्यामुळे त्यांच्यातली विनोदबुद्धी पुरुषांप्रमाणे मुक्तपणे बाहेर येत नसेल का? स्त्रियांजवळ विनोदबुद्धी नसते का?


१८. मी आहे तशा स्वरूपातच माझा स्वीकार लोकांनी करावा, माझ्यावर प्रेम करावं असं मला वाटतं. ही अपेक्षा योग्य आहेका?

१९. मी एकाकी आहे; आणि या एकाकीपणाची मला भीती वाटते. ही भावना दूर कशी होऊ शकेल?

२०. दोन वर्षांपूर्वी मी संन्यास घेतला. पण अजूनही लोकांना मी गुंडच वाटतो. मी ध्यानधारणा करतो. त्यामुळं थोडाफार शांतीचा अनुभवही येतो आहे. लोकांच्या टीकेमुळे मी निराश होतो. मी काय करू?

या प्रश्नांची उत्तरे देताना ओशो हे जसे आध्यात्मिक पातळीवर जातात तसेच मानसशास्त्रीय विश्लेषणावरही भर देतात. विविध दृष्टान्त, उदाहरणे, विनोद, किस्से सांगून ते विवेचन रंगतदार करतात. क़ाही प्रश्नांची उत्तरे सूचक पद्धतीने देतात. पतिपत्नी यांच्या नात्यात सातत्याच्या सहवासाने एक प्रकारचा एकसुरीपणा येऊ लागतो. या नात्यातील उत्स्फूर्तता संपुष्टात येते आणि त्यात अवघडलेपणा येतो. अशा वेळी एकमेकांच्या सहवासातला आनंदाचा भाग लुप्त होत जातो. मग काय करावे? ओशो या प्रश्नाचे उत्तर देताना म्हणतात, '' अशावेळी सरळसरळ मी वेगळं होण्याचा सल्ला देतो. वेगळं होताना शांतपणे, परस्परांविषयी आदर बाळगून, शत्रुत्वभावना येऊ न देता वेगळे व्हा. म्हणजे एकमेकांचे तुम्ही निदान मित्र तरी राहाल. ज्या व्यक्तीवर एकेकाळी जीव तोडून प्रेम केले ती व्यक्ती तिरस्काराला तरी पात्र होऊ नये. प्रेमाचं रूपांतर तिरस्कारात होऊन प्रत्येक गोष्ट विषासमान वाटू नये. काही व्यक्तींना मी हा जो सल्ला देतोय त्याचा राग येईल. मी मोडतोड करण्यास भाग पाडतोय असे ते म्हणतील. पण अशा परिस्थितीत वेगळे होण्याने दोघांनाही अधिक आनंद लाभण्याची शक्यता जास्त....''

एवढेच नाही, त्यापुढेही ओशो जातात आणि सांगतात, ''तेव्हा तुमच्याबरोबरची स्त्री समजा एखादा दिवस दुसऱ्या कोणाबरोबर मैत्रीच्या नात्यानं गेली तर काळजीचं कारणच काय? किंवा तुमच्याबरोबरचा पुरुष असा गेला.... तरीही काळजीचं कारण नाही. प्रत्येकाला सुट्टीची गरज आहे. बदलाची गरज आहे... एखादी सुट्टी, एखादा बदल हा एकत्र राहणं सुसह्य करण्यासाठी किती आवश्यक असतो... हे अनेकांना माहीत नसते.'' (१२३) माणसानं हे लक्षात घ्यायला हवं की त्याच त्याच गोष्टी पुन:पुन्हा चालू ठेवण्याचा प्रत्येकाला कंटाळा येतो. मग ती बायको असो, नवरा असो, अन्न असो की एखादा चित्रपट असो. किती काळ एकच चित्रपट पाहाल? कारण पुढे काय घडणार ते आता माहीत झालेलं असतं... नातेसंबंध मोकळे असायला हवेत. दोघांसाठीही. तरच प्रेमानं पुन:पुन्हा एकत्र यायला बरं वाटेल.'' (१२४)



## त्रयस्थाप्रमाणे स्वतःकडे पाहणे-- हे काही फार अवघड नाही. सृष्टीची दारं आपल्यासाठी मोकळी होणं यासारखं साधं सोप दुसरं काही नाहीच.

ओशोंचे असले विचार त्यामुळे अनेकांना धक्कादायक वाटतील. त्यांनी या प्रश्नोत्तरांच्या ओघात अनेक मार्मिक निरीक्षणे नोंदवलेली आहेत. त्यापैकी काही वानगीदाखल येथे देत आहे.

* संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा यासाठी सारी महत्त्वाकांक्षा एकवटून ठेवायचे काम समाज करीत असतो. समाजाचं स्थैर्य,समाजाची बांधणी ही उपयोगितेशी निगडित असते. म्हणून आध्यात्मिक आणि धार्मिक दृष्टीनं घडणाऱ्या मानसिक घडामोडींसाठी समाजाचे दरवाज़े कायमचे बंद असतात. (२)

* जोपर्यंत तुम्ही प्रत्यक्ष अनुभवाला जाऊन भिडत नाही तोपर्यंत नुसत्या शब्दांना काहीही अर्थ नाही. (३)

* जीवन म्हणजे खरोखर चमत्कार आहे. (३) सामान्य वाटणाऱ्या सर्व अस्तित्वापलीकडे, या प्रकृतीमागे खूप मोठी रहस्यं लपलेली आहेत..... तुम्ही फक्त दारं उघडी ठेवली पाहिजेत.

* रोजचं कंटाळवाणं आयुष्य हे एक प्रकारचं 'ओझं असतं. ते तुम्हाला जन्मापासून मृत्यूपर्यंत रखडत नेत असतं. (४)

* जाणिवांचा विस्तार हा अनुभव ध्यान, धरणा करणाऱ्या अनेकांना येतो. (४)

* समाधी म्हणजे स्वप्न नसलेली गाढ झोप. तुमचं अस्तित्व हे खोलवर गाभ्यात पूर्ण जागंच असतं. फक्त देह हा झोपेच्या अवस्थेत असतो. (६)

* प्रत्येकजण हा अगदी सामान्य असतो परंतु त्या सामान्यत्वात तो कुठेतरी एखादा दैवी धागा बरोबर वागवत असतो. (९)

* तू कधीही स्वत:ला सर्वसामान्य माणूस समजू नकोस. कारण एकदा का तुझ्या मनाची तशी पक्की धारणा झाली की तुझं वर्तनही तसंच घडू लागेल. तो एक प्रकारचा आत्म्याचा कॅन्सरच आहे. (११)

* गांभीर्य हे आजारपणाचं लक्षण आहे आणि हास्य हे निरोगीपणाचं लक्षण आहे. गंभीर वा दु:खी असणं हे आजारपणाचं लक्षण आहे. हसणं म्हणजे संपूर्ण जीवन. ते ईश्वराच्या खूप जवळ नेतं. (१९)

* शब्दांमध्ये व्यक्त होणाऱ्या गोष्टी या बाजारातल्या असतात; मंदिरातल्या नसतात. मंदिरात शांततेची भाषा अस्तित्वात असते. (२२)

* ईश्वर, आत्मा किंवा ऐहिकापलीकडच्या गोष्टींसाठी एकाग्रता मनन-चिंतन उपयोगात येत असेल तरच त्याला ध्यानधारणा म्हणता येईल.(२३)

* ध्यान या शब्दाचा योग्य अर्थ प्रकट होईल असा शब्द इंग्रजीमध्ये नाहीच. (२३)

* ध्यानधारणा करणाऱ्या माणसांच्या डोळ्यात एक निराळीच चमक असते. एक प्रकारची सखोलता जाणवते. करुणा दिसते. शांत भाववृत्ती दिते. (२४)

* साक्षात्कारी माणसापासून मिळणारी शांतता ही अर्थपूर्ण असते. ती शांतता पूर्ण जागरूकतेची शांतता असते. (२६)





## ध्यानधारणा ही एकमेव गोष्ट तुमच्या मनातील मृत्यूची, म्हातारपणाची, रोगी होण्याविषयीची भीती नष्ट करते.

* ध्यानधारणेचा अत्युच्च बिंदू गाठला जाऊन बहरण्याची वेळ येते तेव्हाच शब्दांमधला सूक्ष्म अर्थ कळू लागतो; शब्दांमधल्या रिकाम्या जागा कळू लागतात आणि अर्थ आशयाचा स्फोट होऊन जातो. (२७)

* या दांभिक जगात ध्यानधारणा करणारा माणूस हा तसा उपराच ठरतो. (२८)

* लोक कायम अंधारातच जगत असतात. अंधारात जगण्यामुळे तुमचा स्वत:वरच भरवसा नसतो; तुम्हाला स्वत:च्या कुवतीचीही कल्पना सते. म्हणूनच तुमच्या अंतरंगातली ज्योत पेटायला हवी. तुम्हाला 'आत' पाहता आले तर तुमचं संपूर्ण अस्तित्वच उजळून निघेल. (२९)

* ध्यान धारणेमध्ये तुम्ही संपूर्णपणे शुद्ध स्वरूपात जागरूक जाणिवांमध्ये असता.... जागरूकतेच्या जाणिवा ज्ञात होतात तेव्हा पैसा, प्रसिद्धी, सत्ता, प्रभाव यांच्या इच्छाआकांक्षा लयाला जातात. (३४)

* झाडंझुडपं, प्राणीपक्षी या सर्व चराचर सृष्टी चा एक वैश्विक आत्मा आहे. आपण त्याचे फक्त अंश आहोत. आपण स्वत:ला या विश्वापासून वेगळे समजत असतो तो आपला अहंकार- वेगळं समजणं म्हरजेच अहंकार. ज्याक्षणी ही खोटी कल्पना नाहीशी होते त्या क्षणापासून जीवन हे अद्भुत अनुभवांनी भरून जाते.... (३९)

* चिरंतनाची चव चाखणं आणि इतरांबरोबर तो आनंद घेणं हीच खरी जादू. (४१)

* मन हे आडमुठं असतं. बदल घडवून घ्यायची त्याची तयारी नसते. किंबहुना त्याला बदल नकोच असतो. भूतकाळातला इतक्या नको त्या गोष्टी त्यानं जमा केलेल्या असतात की भविष्यकाळातल्या कोणत्याही शक्यतांबद्दल ते आंधळंच असतं. (५५)


* मन म्हणजे एक स्मरणसाखळी! एक स्मृती आणि स्मृती म्हणजे जागरूकता नव्हे... स्मृती हीएक संपूर्णतया वेगळी प्रक्रिया आहे. जो माणूस बुद्धिमान नसतो त्याची सगळी शक्ती ही 'स्मृती'साठी वापरली जाते. अत्यंत बुद्धिमान माणसे अनेकदा विसरभोळी दिसतात; कारण त्यांची सगळी मानसिक शक्ती ही त्यांच्या बुद्धिमत्तेकडे खेचली गेलली असते.

* जितक्या प्रमाणात तुम्ही जगण्यातला आनंद मिळवाल, तितकं असुरक्षिततेवर तुम्ही प्रेम कराल. असुरक्षिततेने तुमची बुद्धी जास्त प्रखर होईल. सतर्कता सूक्ष्म होईल; आणि तुमच्या जागरूकतेत सतत वाढ होत जाईल. (६२)

* प्रत्येक क्षण संपूर्ण समरस होऊन जगणं हे ध्यानधारणेचं अंतिम सार. (६४)

* प्रकृतीपासून अलग राहू नका. प्रकृतीचाच एक भाग म्हणून जगा. मग प्रकृती तुमची आपोआप काळजी घेईल. (६४)

* कर्तव्य' हा माझ्या दृष्टीनं अगदी घृणास्पद शब्द आहे. 'कर्तव्य' भावनेनं तुम्ही कोणतीच गोष्ट करता कामा नये. प्रेमाच्या भावनेने ती करा किंवा करूच नका. आपलं जीवन हे प्रेममय असायला हवं असं ठरवून जगा. प्रेम उत्तम प्रतिसाद देऊ शकते. तुम्ही प्रेम करीत असाल तर तुमच्याकडून प्रतिसादही उत्स्फूर्तपणे घडतो. तिथं कोणतंही ओझं नसतं. (७४)



## तुमच्यावर निसर्गानं ज्या ज्या उत्तमोत्तम गोष्टींची उधळण केलेली आहे ती त्याची दया समजा.

* तुमचा व्यवसाय ही एक प्रकारची ध्यानधारणाच व्हायला हवी. तुमचा खरेपणा, प्रामाणिकपणा यामुळे व्यवसायातली पिळवणूक थांबू शकेल. (७५)

* जे प्रेम निर्भय असते, जे प्रेम एकाकीपणाला घाबरत नाही, तेच खरं प्रेम. (७९)

* एकटेपणा ही तुमची स्वाभाविकता असते. जन्माला तुम्ही एकटे येता; मरतानाही एकटेच असता. पण ही जाणीव न ठेवता तुम्ही जगत राहता. एकटं असणं म्हणजे एकाकी असणं नव्हे. तुमचं एकटेपण हे सर्जनशील व आनंददायी बनवा. एकाकीपणा एकटेपणामध्ये

* मी दु:खी आहे  असं म्हणू नका. 'दु:खाचे काही ढग माझ्या समोरून आता गेले असे म्हणा. मी रागावलो असं कधी म्हणू नका. रागाचे काही ढग आता माझ्यासमोरून गेले असे म्हणा विचारांची ही पद्धत अवलंबिली की तुम्हाला छळणारे अनेक विचार दूर पळतील.  विचारांपासून मुक्त होण्याची नवी किल्लीच तुमच्या हाती येईल. (८१)

* एकटेपणा आनंदानं स्वीकारणारी मंडळी जास्त चांगल्या पद्धतीनं लोकांशी संबंध ठेवू शकतात. कारण ती 'त्यांची' गरज असते. इथे हे लोक मागणारे नसतात. अपेक्षा बाळगणारे नसतात. आपल्या जवळच्या आनंदाच्या, शांती समाधानाच्या वैपुल्यामुळेच ते चांगले प्रेमाचे संबंध राखू शकतात. (८२)

* ध्यानधारणेच्या प्रगतीत अडथळा आणणाऱ्या दोन गोष्टी म्हणजे दडपण आणि नैराश्य. (८७)

*** हास्य हे मानवाच्या बाबतीत त्याच्या उत्क्रांतीचं लक्षण आहे. (८९)**

* दुसऱ्याला हसणं फार सोपं आहे. कारण त्यामुळे तुमचा अहंभाव सुखावला जातो. स्वत:ला हसणं म्हणजे मोठं कर्तृत्व आहे कारण स्वत:ला हसणं म्हणजेच नम्र; निगर्वी असणं. (९०)


* ध्यानधारणा म्हणजे मनाचा मृत्यू. ज्या दिवशी तुमची ध्यानधारणेतील प्रगती शेवटचा टप्पा गाठते त्या क्षणापासून मनाची गरज संपते. त्यामुळे त्यापूर्वीच्या काळात सर्व प्रकारचे अडथळे निर्माण करण्याचे प्रयत्न मन करत असते. कारण आता 'मनाच्या' जीवनमरणाचा  प्रश्न निर्माण झालेला असतो. (९१)

* ध्यानधारणेच्या मार्गावरून प्रवास करणं म्हणजे खरं जीवन जगणं. जीवनाचा आनंद, हास्य, संगीत यांचा लाभ घेणं. (९४)

* जागरूकता ही सृष्टीमध्ये पहिल्यापासून आहे.. आताही आहे आणि पुढेही असणार आहे. जागरूकता हा सृष्टीचा गाभा आहे. (९७)

* गर्दीमध्ये बुद्धिमत्ता असणं हे धोकादायकच! गर्दीला बुद्धिमान लोक कधीच नको असतात. गर्दीला फक्त आंधळा विश्वास ठेवणारी मंडळी हवी असतात. सत्तेला, देशाला, स्पर्धेला प्रामाणिक असलेली मंडळी हवी असतात. स्वत:शी प्रामाणिक असणारी मंडळी नको असतात. (१०१)





## फक्त स्वत:चंच ऐका, लहान का असेना परंतु स्वत:चा आवाज ऐका...  कोणतीही भीती न बाळगता...

* तुम्ही जर निवड विरहित आयुष्य जगायचं ठरवलंत, उत्स्फूर्तपणे जगत जीवनाचा क्षण न क्षण आनंदाचा मानलात, समोरच्या प्रत्येक गोष्टीला योग्य प्रतिसाद दिलात तर तुमच्या विकासाचं अंतर तुम्ही वेगानं पार कराल. एक क्षणही तुम्ही निराश होणार नाही. (१०१)

* बुद्धिमत्ता ही नेहमी अज्ञात गोष्टींचा शोध घेत असते; आणि तो शोध नेहमी संदिग्ध असतो. स्पष्ट नसतो. (१०३)

* बुद्धिमत्ता आणि जागरूकता या संधीच्या आणि आव्हानाच्या शोधात असतात. धोका पत्करायला त्या तयार असतात. (१०४)

*** तुमचा भूतकाळ नाहीसा करण्यासाठी ध्यानधारणा ही माझी पद्धत आहे. कारण तुमचं मन म्हणजे दुसरं तिसरं काही नसून फक्त भूतकाळातला कचरा आहे. माझ्या ध्यानधारणेमुळं तुमच्या जीवनाची नव्याने सुरुवात होईल. (११३)**

*** जीवन हा एक शाश्वत चमत्कार आहे. शांततेच्या जादूनेच त्याचे दरवाजे उघडतात. (११३)**

* तुम्ही जेव्हा तुच्या जीवनातल्या अंतिम सत्यापर्यंत पोहोचता तेव्हा त्या सत्याचा दरवळ म्हणजे देव... तुमच्या हृदयातून, तुमच्या अस्तित्वातून प्रेम करुणेचे, सौंदर्याचे किरण बाहेर पडतात, तेव्हा देवाचं अस्तित्व तुम्हांला जाणवेल. (११४)

* खरोखर हे जीवन चमत्कारांनी भरलेलं आहे. तुमचं अंत:करण खुलं ठेवलंत तर सगळीकडे तुम्हाला आनंद भरलेला दिसेल. या जीवनाचा मनापासून आनंद घ्या, सृष्टीच्या चमत्कारांचा अनुभव घ्या. निष्पाप मुलासारखं निखळपणे जगा. (११४)

*** ज्ञान हा दरवाजा नसून ती एक भिंत आहे. शहाणपणाला ती प्रवेश नाकारते. (११४)** * जी व्यक्ती तुम्हाला मुक्तता देईल तिच्याबद्दल प्रेम निर्माण होईल जी व्यक्ती तुम्हाला मोकळेपणा देणार नाही तिच्याबद्दलचे प्रेमही टिकणार नाही. (१२४)

* जीवनामध्ये 'मन' हे नेहमी प्रत्येक गोष्टीविषयी तुम्हाला द्विधाचित्त करीत असते. मनाचा अर्धा भाग त्या गोष्टीला होकार देत असतो, तर अर्धा भाग नकार देत असतो. त्यामुळे तुम्ही कायम तणावग्रस्त राहता. (१४३)

* ज्याक्षणी माणसाला आत्मसाक्षात्कार होतो त्या क्षणी त्याचे विचार स्मरणापासून तुटले जातात. त्याला उत्स्फूर्तता प्राप्त होते; ती उत्स्फूर्तता प्राप्त स्मरणशक्तीची जागा घेते. (१४९)

*** परिस्थिती सतत बदलत असते; आणि तुमच्या स्मरणामधे असणारी उत्तरं मात्र न बदलणारी असतात. त्यामुळं वृद्ध माणसं ही वाढणाऱ्या तरुणांमध्ये निरुपयोगी ठरतात. (१४९)*** प्रेम हे नेहमी माणसाला आहे तसं स्वीकारतं. (१५६)

**पृष्ठे : १८२  किंमत : १५० रु. सभासदांना : ११३ रु. पोस्टेज : २० रु.**




# प्रहार

**प्रकाश पोहरे**

**भारताची मानसिक गुलामगिरी, आर्थिक दिवाळखोरी आणि युवापिढीची दिशाहीनता यांच्यावर घणाघाती प्रहार**

अकोला येथील दैनिक देशोन्नती या वृत्तपत्राने विदर्भाप्रमाणेच पुण्यामुंबईतही आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्या दृष्टीने नामवंतांचे लेखनसहाय्य आणि वितरण व्यवस्थेचे व्यापक जाळे निर्माण करण्याचे कार्य चालू आहे. देशोन्नतीचे मालक-संपादक प्रकाश पोहरे हे आपल्या दैनिकातून स्थानिक प्रश्नांवर अनेक लढाया लढत आलेले आहेत; आणि त्यासाठी प्रसंगी कोर्टकचेऱ्यांमध्ये गेलेले आहेत. पत्रकार जनतेच्या वतीने जनतेच्या हितासाठी अशा लढायांमध्ये पडतात; परंतु अनेकदा जनतेची साथ अटीतटीच्या प्रसंगी पत्रकारांना मिळत नाही आणि ते तोंडघशीही पडतात. प्रकाश पोहरे यांच्या गाठीशी असेही अनुभव विपुल आहेत. अकोल्यातील नागरिक मंचाच्या स्वच्छता मोहिमेला पाठिंबा देऊन नगर परिषदेचे अधिकारी व नगराध्यक्ष यांच्यावर 'प्रहार' या सदरातून सणसणीत समाचार घेणारा मजकूर लिहिला. गोळा केलेल्या दोन ट्रक कचऱ्यातील घमेलाभर कचरा नगराध्यक्षांच्या टेबलावर टाकला; आणि त्याबद्दल त्यांच्यावर प्रशासनाने तक्रार केल्याने प्रकाश पोहरे यांना पोलिसांनी न्यायालयीन कोठडीत टाकले. जामीन मिळूनही 'शहर सफाई करणं हा गुन्हा नाही' असे म्हणून जामीनावर सुटका करून घेण्यास त्यांनी नकार दिला. त्यांच्या या वीरोचित कृत्याची सामाजिक प्रतिक्रिया मात्र न उमटल्याने त्यांना जामीनपत्रावर सही करून सुटका करून घ्यावी लागली अशासारख्या घटनांनीही त्याचे मनोबल खचलेले नाही.

'प्रहार' या सदरात त्यांनी लिहिलेल्या साठ लेखांचे संकलन प्रहार या नावानेच आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले आहे. जागरूक व झुंजार पत्रकारितेचा वैदर्भीय आविष्कार म्हणून या संग्रहाचे महत्त्व व मोल मोठे आहे.

प्रकाश पोहरे हे झुंजार पत्रकार असले आणि सामाजिक परिवर्तनाचा वसा घेऊन लेखन करीत असले तरी गुरुदेव गोएनका यांच्या विपश्यना शिबिरांतले निष्ठावंत साधक आहेत. त्यामुळे प्रक्षोभक विचारही ते संयतपणे व संयमाने मांडतात. पण त्या मागची तळमळ आणि पोटतिडिक जाणवल्यावाचून राहत नाही. त्या त्या वेळच्या प्रासंगिक घटनेवरील भाष्य असेच या लेखांचे स्वरूप असल्याने त्यात भरपूर वैविध्य आहे.

आर्थिक उदारीकरण, संगणक क्रांती, प्रसारमाध्यमांवरील परकीय प्रभाव, चीनची आर्थिक





**भारत हा फुकटप्रधान देश आहे. तुम्हीही फुकट कमवा आणि आम्हालाही फुकट द्या अशी फुकटेगिरी सरकारी कारभारात राजरोस चालते.**

क्षेत्रातील प्रचंड मुसंडी, केबल ऑपरेटर्सनी चालवलेली लूट, कापूस एकाधिकार खरेदीचे गौडबंगाल, गुजरातमधील गोध्रा हत्याकांड, सार्वजनिक उपक्रमांमधील निर्गुंतवणूक, नोकरशाहीचे बांडगूळ, कुटुंब कल्याण, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे अडचणीत आलेले उद्योगधंदे, संसदभवनावरील हल्ला, भारताची इंग्लिस्तानकडे चाललेली वाटचाल, दुर्जन शक्तीचा नंगानाच, आयुर्वेदाची उपेक्षा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवादी कारवाया, विदेशी वस्तूंचे आकर्षण, स्वतंत्र विदर्भराज्याची संकल्पना, मुलामुलींच्या पेहरावातील नव्या फॅशन्सचा धुडगूस, तंत्रज्ञानाच्या नावावर चाललेली लूट, नेत्यांच्या सुरक्षाव्यवस्तेवरील अफाट खर्च, मराठी वाहिन्यांची अवस्था, इतिहासाचे पुनर्लेखन आणि विकृतीकरण, पोलिस खात्याची पुनर्रचना, तहेलकाने केलेला पर्दाफाश, सरकारी खजिन्यातला खडखडाट, व्हॅलेंटाइन डे वगैरे पाश्चात्य प्रथांचे अनिष्ट अनुकरण, एन्रॉन व भ्रष्टाचार, खुल्या अर्थव्यवस्थेने लघुउद्योजकांची केलेली फरफट, मायकेल जॅक्सनचा धांगडधिंगा, टीव्हीवरील उत्तान उच्छृंखल कार्यक्रम, पुतळ्यांचे राजकारण, इंग्रजीचे फॅड, शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेतील फाटाफूट इ. इ. या प्रत्येक विषयावर प्रकाश पोहरे हे परखड मतप्रदर्शन करतात.

प्रकाश पोहरे यांनी कापसाच्या किंमतीबाबत सीमापार आंदोलन केले. त्यामुळे कापसाचा भाव तीन महिन्यात ९५० पासून १९०० पर्यंत पोचला. परंतु प्रकाश पोहरे यांनी शरद जोशींवर टीका करताच हे कापूस उत्पादक प्रकाश पोहरे यांनाच खलनायक ठरवून मोकळे होतात. म्हणून त्यांचा शरद जोशींवर राग आहे. शरद जोशी यांची शरद पवारांच्या संदर्भातील वक्तव्ये कशी संधिसाधूपणाची होती याकडेही पोहरे लक्ष वेधतात. (४०-४१)

''आज जेव्हा विदर्भ सर्व दृष्टींनी कंगाल आणि बकाल झाला आहे तेव्हाच स्वतंत्र विदर्भाची बोंब पुन्हा सुरू होणे ही नैसर्गिक बाब निश्चित नव्हे. दिल्लीतल्या नेतृत्वाने फटकारले की तलवारी म्यान करण्याऱ्या विदर्भवादी आंदोलनाचा 'कणखर' बाणा पोहरे यांच्या खिल्लीचा विषय व्हावा यात नवल नाही.''

या देशातील राजकीय पुढाऱ्यांसाठी भूक, बेकारी, दारिद्र्य हे विषयच नाहीत. असलेच तर कधीमधी चघळण्याच्या लायकीचे क्षुद्र विषय आहेत. त्यांच्यासाठी मंदिर, मशीद, पुतळे हे खरे महत्त्वाचे विषय आहेत. त्यासाठी कुणी मंदिर निर्माण ही राष्ट्रीय अभिव्यक्त असल्याचे सांगतो तर कुणी कुंभमेळ्याच्या पर्वावर गंगायमुनेच्या संगमावर होली डीप घेतो. कारण हे प्रकार करूनच या देशातील जनतेची सहानुभूती आणि मते मिळवता येतात.'' (९३) असे फटके मारण्यात प्रकाश पोहरे प्रवीण आहेत.

''आजचे सिनेमे, त्यातील सलमान खान, शाहरूख खान, अमीर खान, फरदीन खान, संजय खान या सर्व 'खानावळी' आणि अमेरिकन दिसणारा, वागणारा ऋतिक रोशन, खंडाळा गर्ल राणी मुखर्जी, करिना, ऐश्वर्या इ. कायम झटके देत नाचणाऱ्या पोरी. त्यांची चरित्रे, त्यांनी



## ''नोकरशाही मुजोर, जनप्रतिनिधी लाचार, लोकशाहीला नाही उरला कुठलाच आधार'' हे पोहरे यांचे आवडते सूत्र आहे.

रंगवलेली पात्रे - या मंडळीच्या माध्यमातून आणि विविध वाहिन्यांद्वारे आज राष्ट्रीय संपत्ती असलेल्या युवापिढीवर विदेशी लुटारूंनी लक्ष केंद्रित केले आहे. एन्जॉय व बी हॅपी हे शिकवून खिशातून पैसा काढायला लावणारी जीवनपद्धती रुजवली जात आहे. सरळ मार्गाने धर्मांतर घडविणे जमत नाही- म्हणून या मंडळींनी धूर्तपणे आपल्या कार्यपद्धतीत थोडा लवचिकपणा आणलाय.'' असा इशारा देताना पोहरे यांच्या लेखणीला धार यावी यात नवल नाही.

''नोकरशाही मुजोर, जनप्रतिनिधी लाचार, लोकशाहीला नाही उरला कुठलाच आधार'' हे पोहरे यांचे आवडते सूत्र आहे.

भारत सरकार चुकीच्या आर्थिक धोरणामुळे देशाला दिवाळखोरीतून अपरिहार्यपणे येणाऱ्या गुलामगिरीकडे ढकलत आहे. त्याविरुद्ध प्रत्येक सच्च्या भारतीयाने पेटून उठून उभे राहून बुलंद आवाजात स्वदेशी, ग्रामोन्नती, साधी राहणी-उच्च विचारसरणी यांचा नारा दिला पाहिजे,


**पृष्ठे : २८५ किंमत : १५० रु. सभासदांना : ११३ रु. पोस्टेज : २५ रु.**

## राजकीय सत्य निर्भिडपणे मांडणारी पुस्तके



### द प्लेन ट्रूथ

एन. के. सिंग अनु. माधव मोर्डेकर **किंमत - २५० रु.**




### भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार

**किंमत - २०० रु.** एन. के. सिंग अनु. माधव मोर्डेकर



### ख्यातनाम इतिहासकार

अरूण शौरी अनु. सुधा नरवणे **किंमत - १५० रु.**



### बिग इगोज,स्मॉल मेन

**किंमत - ८० रु.** राम जेठमलानी अनु. माधव मोर्डेकर



### भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत

शशी थरूर अनु.मधुकर तोरडमल **किंमत - २०० रु.**





# पुरस्कार

**छंद लेखनाचा! पुस्तकाला 'सृजन साहित्य' पुरस्कार**

मराठी वृत्तलेखक संघाच्या जयवंती निमकर पुरस्कृत स्पर्धेत कुळगाव बदलापूरचे वृत्तपत्रलेखक अनिल ह. पालये यांच्या छंद लेखनाचा या पुस्तकाला साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. सुभाष भेंडे यांच्या हस्ते 'सृजन साहित्य' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात वृत्तलेखक संघाच्या ४६ व्या वृत्तपत्रलेखक संमेलनात हा पुरस्कार पालये यांना प्रदान करण्यात आला.

अनिल पालये हे रा. स्व. संघाचे स्वयंसेवक असून कुळगाव-बदलापूरमधील विविध सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राशी त्यांचा जवळचा संबंध आहे.

**डॉ. गोरे यांना मुक्तिबोध पुरस्कार**

महाराष्ट्र सरकारच्या हिंदी साहित्य अकादमीतर्फे हिंदी-मराठीतील समांतर तसेच दर्जेदार लेख़न कार्याबद्दल देण्यात येणारा 'गजानन माधव मुक्तिबोध मराठी भाषी हिंदी लेखन पुरस्कार' या वर्षी मराठी-हिंदीतील नामवंत लेखक डॉ. बलभीमराज गोरे यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचे स्वरूप एकावन्न हजार रुपये रोख असे आहे.

डॉ. गोरे यांनी आतापर्यंत सुमारे सातशे लेख व ४८ ग्रंथ लिहिले आहेत. यांपैकी अठरा ग्रंथ स्वलिखित तर उर्वरित तीस ग्रंथ अनुवादित, संपादित स्वरूपातील आहेत. इंग्रजीतील सोळा हजार शब्दांना हिंदी, मराठी शब्दांचा पर्याय देणारा शब्दकोशही त्यांनी तयार केला आहे. पुरस्कार वितरण समारंभ १४ सप्टेंबरला मुंबई येथे होणार आहे.

**हा तर माझ्या माहेरचा पुरस्कार**

'कौसल्येचा राम बाई'पासून ते 'खुलवते मेंदी माझा रंग गोरापान गं' पर्यंतच्या गीतांनी गतकाळातील स्मृतींना उजाळा देत पडद्यावर स्त्रीची विविध रूपे साकार करणाऱ्या सुलोचनादीदींना प्रतिष्ठेचा 'चित्रभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यावेळी 'हा माझा माहेरचा पुरस्कार आहे' अशा शब्दात त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

४० व्या चित्रपट महोत्सवात सुलोचना यांना कलामहर्षी बाबूराव पेंटर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून उत्पादनशुल्कमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. जयश्री गडकर यांना 'व्ही. शांताराम' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार 'भेट' चित्रपटातील श्रेयस तळपदे यांना, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीसाठीचा पुरस्कार रिमा लागू यांना मिळाला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर सुलोचना बाई म्हणाल्या : हा पुरस्कार यापूर्वी अनेक महान व्यक्तींना मिळाला आहे. माझे गुरू भालजी पेंढारकर यांनाही हा पुरस्कार मिळाला असल्याने

हा माझ्या माहेरचा पुरस्कार आहे. चित्रपट व्यवसायातील सर्वजण माझी नातलग मंडळी आहेत. आजवर पुण्यात एकापेक्षा एक वरचढ पुरस्कार मिळाले. हा पुरस्कार म्हणजे त्यावर कळस आहे.

अध्यक्ष प्रभाकर पणशीकर यांनी मराठी चित्रपटांकडे रसिकांनी पाठ फिरवली असल्याबद्दल खंत व्यक्त केली. त्याचबरोबर आता इतिहासावर जगण्यापेक्षा ही निराशाजनक परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी आवाहन केले. हिंदी चित्रपटातील कलावंतांच्या तोडीचे कलावंत मराठीत असल्याचे नमूद केले.

चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने मनोरंजनाचे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात सुलोचना यांच्या चित्रपटातील गाजलेल्या गाण्यांशिवाय 'ढगाला लागली कळ' आणि 'ऐका दाजिबा'चे रिमिक्स दाद घेऊन गेले. आदेश बांदेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेल्या विनोदी कवी संमेलनाला टाळ्या मिळाल्या. छाया कुटेगावकर यांच्या 'पावणं इचार काय हाय तुमचा' या लावणीने धमाल उडवून दिली.

## सई परांजपे, फैयाज, नाना पाटेकर यांना नाट्य परिषदेचे विशेष पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने वार्षिक पुरस्कारांच्या विजेत्यांची २००२-२००३ साठी नावे जाहीर केली. महाराष्ट्र राज्य सरकार पुरस्कृत राम गणेश गडकरी पुरस्कारासाठी ज्येष्ठ नाट्यलेखिका-दिग्दर्शिका-सई परांजपे यांची निवड करण्यात आली.

बालगंधर्व पुरस्कारासाठी गानअभिनेत्री फैयाज यांची तर चिंतामणराव कोल्हटकर पुरस्कारासाठी अभिनेते नाना पाटेकर यांची निवड करण्यात आली. 'रंगशारदा' ही संस्था केशवराव भोसले पुरस्कारासाठी मानकरी ठरली आहे.

१४ जून या नाटककार गो. ब. देवल यांच्या स्मृतिदिनी नाट्यगृह, विलेपार्ले येथे या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. नाट्यक्षेत्रात गौरवास्पद कामगिरी केलेल्या ६३ रंगकर्मींना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

पुरस्कार विजेत्यांमध्ये अभिनेते रवी पटवर्धन, प्रशांत दामले, भरत जाधव, कमलाकर टाकळकर, चंदू डेग्वेकर, अविनाश खर्शीकर, प्रदीप पटवर्धन, सतीश पुळेकर, प्रमोद पवार, अविनाश नारकर, अभिनेत्री ऐश्वर्या नारकर, जयश्री शेजवाडकर, शकुंतला नरे, दीपा श्रीराम, सुहास परांजपे यांना गौरविण्यात आले. गायिका आशा खाडिलकर, दिग्दर्शक कुमार सोहनी आणि विजय केंकरे यांच्यासह चंद्रकांत ढवळपुरीकर, आरती नगरकर या लोककलावंतांचा, पुष्पा शिरोडकर व मधुकर आंगणे या कामगार रंगभूमीवरील गुणवंत कलाकारांचा नाटककार जयंत पवार, अभिराम भडकमकर, डॉ. चंद्रशेखर फणसळकर, तुळशी बेहरे यांचा समावेश आहे.

राज्य नाट्य स्पर्धेत चमक दाखविणाऱ्या सुनील गुरव, प्रदीप पाटील रवींद्र देवधर, विजय शिंगणे, सुप्रिया बापट, सुजीव मेहेंदळे, किशोर चौघुले, आनंद प्रभुदेसाई, राम दौंड यांना पारितोषिक जाहीर झाली आहेत. अन्य पुरस्कार विजेत्यांमध्ये वामन कोकाटे, तुळशीराम गावडे, ल. मो. बोरकर, सीताराम गावकर अजितेम जोशी, शांताराम सुर्वे, अनिल जुवेकर, अनंत वालावलकर, विलास कुडाळकर, बी. एन. पतंगे मास्तर, सुनील दातार हे रंगकर्मी आहेत. संगीत नाटकातील कामगिरीबद्दल प्रा. डॉ. श्रीकृष्ण जोशी, गौरी भागवत, विजय रानडे यांना



गौरविण्यात आले.

उत्कृष्ट नाट्य निर्मितीचे अल्बा पंडित स्मृती मराठी रंगभूमी पारितोषिक 'सुयोग' नाट्यसंस्थेच्या 'नकळत सारे घडले' या नाटकास द. ग. फणसे गौरव पारितोषिक 'खल्वायन'. रत्नागिरी या संस्थेच्या 'संगीत शांतिब्रह्म' या नाटकास आणि प्रा. कमलाकर सोनटक्के गौरव पारितोषिक 'नाट्य आराधना', सोलापूर या संस्थेच्या 'त्रिकोणाची चवथी बाजू' या नाटकास देण्यात आले.

## वि. पु. भागवत स्मृती पुरस्कारासाठी 'पद्मगंधा प्रकाशन'ची निवड

प्रकाशन व्यवसायात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मुंबई मराठी साहित्य संस्थेच्या वतीने वि. पु. भागवत स्मृती पुरस्कारासाठी 'पद्मगंधा प्रकाशन'ची निवड करण्यात आली आहे.


मुंबई येथे २ ऑगस्ट रोजी मराठी साहित्य संघातर्फे हा पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे.

संशोधन, समीक्षा, साहित्यविचार, लोकसाहित्य, संतसाहित्य याबरोबरच ललित, विज्ञान, बालसाहित्य, सामाजिक अशा विविध विषयांवरील सुमारे दोनशेहून अधिक पुस्तके 'पद्मगंधा'चे अरुण जाखडे यांनी प्रकाशित केली आहेत.

## श्रेष्ठ गीतकार गुलजार यांची मेहता पब्लिशिंग हाऊसला सदिच्छा भेट

हिंदीतील श्रेष्ठ साहित्यिक, दिग्दर्शक, कवी गीतकार गुलजार यांनी नुकतीच मेहता पब्लिशिंग हाउसला सदिच्छा भेट दिली. गुलजारांची त्रिवेणी, धागे ही दोन पुस्तके मराठीतून मेहता पब्लिशिंग हाऊसने सादर केली आहेत. त्रिवेणीचा अनुवाद श्रेष्ठ कवयित्री शान्ता शेळके यांनी केला आहे. आणि ती शान्ताबाईंची अखेरची कलाकृती ठरली. या पुस्तकांच्या निमित्ताने गुलजारजींशी मेहता पब्लिशिंग हाऊसचे दृढ ऋणानुबंध जुळले.

मेहतांनी त्यांचे भरभरून स्वागत केलं. त्याचा मनापासून स्वीकार करून गुलजारजींनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. स्वामी, श्रीमान योगी, आय डेअर, रुचिरा, सिलेक्टीव्ह मेमरी, बिझिनेस महाराजे या पुस्तकांच्या देखण्या निर्मितीबद्दल प्रशंसा केली.



# फुले आणि काटे

**मराठी वाङ्मयाची पालखी यांच्या खांद्यावर !**

छोट्या छोट्या गावांमध्येही साहित्यिक जाणीव कशी जिवंत आहे, रसरसलेली आहे हे अगदी साध्या साध्या उदाहरणांमधूनही दिसतं. साहित्यिक उपक्रमांच्या निमित्ताने मी गावोगावी फिरते, तेव्हा मला या जिवंतपणाचं प्रकर्षाने प्रत्यंतर येतं.

गेल्या वर्षीची गोष्ट. सांगली जिल्ह्यात विट्यापासून काही किलोमीटर दूर, जिथे वीज आणि एस. टी.चाही काही भरवसा नाही, अशा अगदी आतल्या बाजूच्या रामापूर नावाच्या खेड्यात मी संमेलनासाठी गेले होते. स्वाती शिंदे-पवार नावाच्या एका कवितावेड्या कवयित्रीनं ते भरवलं होतं. निमित्त होतं तिची कन्या 'अक्षरा' हिच्या वाढदिवसाचं. तिथं अगदी उत्स्फूर्त वातावरण होतं. गावातले लोक मनापासून या उपक्रमात सहभागी झाले होते. विटा, इस्लामपूर, सांगली, कोल्हापूर अशा आसपासच्या परिसरातून कितीतरी नवे कवी लेखक तिथे आले होते.

हा अनुभव चैतन्यदायी होता. मरगळ झटकून टाकणारा होता. स्वातीच्या कुटुंबियांची तिला असलेली साथही नजरेत भरण्यासारखी होती. आपल्या लेकीचा वाढदिवस अशा प्रकारे 'साहित्यिक जागरण' करून साजरा करावा असं वाटणं, हेच मुळी अप्रूप. गेली चार वर्ष स्वाती अशाप्रकारे हे 'जागरण' करतेय.

दस्तुरखुद्द विट्यात गेली वीस-पंचवीस वर्ष नित्यनेमाने विटा साहित्य संमेलन संपन्न होत आलंय. हीच गोष्ट औदुंबरची. औदुंबर हे कवी सुधांशूचं गाव. कृष्णेच्या काठावरचं. इथे दरवर्षी कृष्णामाईच्या साक्षीने, सुधांशूंच्या पुढाकाराने एक दिवसाचं संमेलन साजरं होत असतं. या उपक्रमालाही पंचवीस एक वर्ष सहज झाली असतील. इस्लामपूरमध्ये प्राचार्य विश्वास सायनाकर, शैला सायनाकर, प्रदीप पाटील यांच्या प्रयत्नाने साहित्यिक वातावरण सतत जागतं ठेवलं जातंय. हिमोफेलियासारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेला आणि वेदनेला सुंदर शब्द देणारा चैतन्य माने नावाचा अस्सल कवी इथेच भेटतो !

काही महिन्यांपूर्वी कऱ्हाडपासून काही अंतरावर असलेल्या कुंभारगावामध्येही मला असाच प्रसन्न करणारा अनुभव मिळाला. चंद्रकुमार नलगे यांच्या पुढाकाराने दक्षिण महाराष्ट्र साहित्य संस्थेने इथे ग्रामस्थांच्या सहकार्याने संमेलन भरवलं होतं. गावातल्या पतंगे कुटुंबाचा त्यात सिंहाचा वाटा होता. इथेच मला चांगली, तरल कविता लिहिणारी वैशाली पतंगे भेटली. ती सूत्रसंचालनही उत्तम करते. बारावीच्या परीक्षेत ती महाराष्ट्रात पहिली आलीय. एखाद्या छोट्या गावात अशी रत्नं दडलेली असतात, त्यांचा पत्ता एरवी कसा लागणार ?

अहमदनगरमध्ये साहित्यिक वातावरण जिवंत आहे. दिवंगत कवयित्री संजीवनी खोजे हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी कवितेचं जागरण होतं. श्रीधर अंभोरे हा जातिवंत चित्रकार इथेच भेटतो. सुमती लांडे या संवेदनशील लेखिकेची प्रकाशिकेची ओळख इथेच होते. बाबासाहेब सौदागरसारखा गावाकडलं वातावरण जिवंत करणारा कवी इथे सापडतो. दीपा निसळच्या स्मृतिप्रीत्यर्थही अहमदनगरमध्ये असे उपक्रम पार पडतात.



कुसुमाग्रजांचा तेजस्वी स्पर्श झालेल्या नाशिकमध्ये कुसुमाग्रज प्रतिष्ठान अनेक उपक्रम राबवत असतं. यशवंत पाठक, किशोर पाठक, संजय चौधरी, प्रताप लोके वगैरे साहित्यिक मंडळी उत्साहाने धडपडत असल्याचं दिसतं. अरुण काळेसारखा एक तरुण कवी इथे आंबेडकरी विचारांचं साहित्य संमेलन भरवतो. सोलापुरात दत्ता हलसगीकर, लक्ष्मीनारायण बोल्लीसारखे साहित्यिक नव्या लेखक-कवींच्या शोधात असतात. सोलापुरातूनच नीतिन वैद्य, जयंत राळेरासकर आदी मंडळी 'आशय' नावाचा आशयघन दिवाळी अंक प्रसिद्ध करतात. विदर्भातल्या अकोला शहरामध्ये हिम्मत शेकोकार, सुरेश पाचकवडे, भगवान भोईर हे साहित्यिक नवे 'अंकुर' जोपासण्याची धडपड गेली अनेक वर्षे करत आहेत. सटाण्यासारख्या छोट्या गावात 'साहित्यायन'सारखे उपक्रम घडतात. साताऱ्यात बाबासाहेब आंबेडकर अकादमी अधूनमधून वाङ्मयीन चर्चा-परिसंवादांचे आयोजन करत असते.

मराठवाडा ही तर परिवर्तनवादी चळवळींची कर्मभूमीच. इथलं साहित्यिक वातावरणही जिवंत आहे. एकेकाळी नरहर कुरुंदकर हे मराठवाड्यातल्या नव्या लेखकांचं प्रेरणास्थान होतं. आज त्यांचा वारसा मराठवाड्यातली अनेक मंडळी जपत आहेत. जालन्यामध्ये दरवर्षी नित्यनेमाने 'कवितेचा पाडवा' साजरा होतो. हिंगोलीत 'तुलसाबाई सोमाणी प्रतिष्ठान'च्या वतीने सतत वाङ्मयीन उपक्रम राबवले जातात.

विदर्भात नागपूर, अकोला, अमरावती, बुलढाणा या शहरांनी आणि लहान-मोठ्या अनेक गावांनी मराठीला कितीतरी साहित्यिक दिले आहेत. इथे अनेक धडपडी मंडळी आहेत. लेखनाला चांगला दम असलेले लेखक-कवी आहेत. प्रा. विठ्ठल वाघ, नारायण कुलकर्णी-कवठेकर, सुधाकर गायधनी, श्रद्धा पराते, भगवान ठग, सुभाष सावरकर, अशोक थोरात.... धडपड्या माणसांची ही यादी खूपच लांबत जाईल. प्रशांत असनारे त्याच्या सारखा आश्वासक, उगवता कवी इथे भेटतो.

अरुणा सबाने सारखी धडपडी कार्यकर्ता इथे 'आकांक्षा' नावाचं फुले-आंबेडकरी विचाराला वाहिलेलं त्रैमासिक नागपूरहून चालवते.

गोव्यात गोमंतक मराठी अकादमी, गोवा कला अकादमी या संस्था कार्यरत आहेत. प्रा. गोपाळ मयेकर, गोविंद काळे, माधवी देसाई, प्रा. सोमनाथ कुमारपंत, सुदेश लोटलीकर, पुष्पाग्रज, लीना पेडणेकर, रेखा ठाकूर, डॉ. विठ्ठल ठाकूर, सुमेधा कामत अशी वेगवेगळ्या उपक्रमांत सतत गुंतलेली काही मंडळी मला भेटली.

ही अशी सगळी माणसं धडपडताहेत. जी मला माहीत आहेत त्यांची नावं मी इथे सांगितली, याहून आणखी कितीतरी जण आहेत जे इतकंच मोलाचं काम करत आहेत. त्यांच्या धडपडीमुळे नव्या लेखक-कवींना स्थानिक पातळीवर व्यासपीठ लाभतंय. प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळतंय. या संदर्भात रामदास फुटाणेंच्या उपक्रमाचं महत्त्व लक्षात घेतलं पाहिजे. महाराष्ट्रातल्या काना-कोपऱ्यातले पाच-पन्नास कवी त्यांनी धुंडाळले आहेत. महाराष्ट्रभर कवितांचे कार्यक्रम करून त्यांनी या कवींना सादर केले आहे. प्रकाश घोडके, नारायण सुमंत सारखे ग्रामीण भागात राहणारे, शेतामध्ये राबणारे कवी, प्रकाश पाठारेसारखा कामगार कवी, तुकाराम

दांडेसारखा अस्सल आदिवासी कवी असे कितीतरी जण त्यामुळे महाराष्ट्राला परिचित झाले आहेत. फुटाणेंच्या या उपक्रमावर टीकाही होते. त्याची कारणं आणि मुद्दे वेगळे असतील, पण त्यामुळे त्यांच्या या कामाचं महत्त्व कमी होत नाही.

मराठी वाङ्मय विश्वात प्रकर्षाने उणीव भासते ती निखळ वाङ्मयीन नियतकालिकांची. एखादा अपवाद वगळला तर आज मराठी नियतकालिकांमध्ये वाङ्मयाला फारशी जागा उरलेली नाही. नियतकालिकांचं अर्थकारण हे अडचणीचं असल्याने ही परिस्थिती आहे. तरीही अनेकजण प्रसंगी स्वत:च्या खिशाला कात्री लावून नियतकालिकं - अनियतकालिकं प्रसिद्ध करताहेत. धुळ्यासारख्या ठिकाणाहून पुरुषोत्तम पाटील कसदार आणि दर्जेदार कवितेला व्यासपीठ देण्यासाठी 'कवितारती' प्रकाशित करताहेत. अशाच प्रकारे 'अनुष्टुभ'हे मासिक काम करत आहे. ललित साहित्य, वाङ्मयीन चर्चा - संवादाचं एक माध्यम म्हणून या मासिकाने आदराचं स्थान मिळवलं आहे. मुंबईच्या जवळपास राहणारे हेमंत दिवटे, श्रीधर निळवे, संदेश ढगे, रवींद्र लाखे ही साहित्याकडे गंभीरपणे पाहणारी, साहित्याच्या संदर्भात चर्चा घडावी म्हणून आसुसलेली मंडळी 'अभिधानंतर' हे नियतकालिक मोठे परिश्रम घेऊन चालवत आहेत. मुंबईतूनच 'नव्यांची अक्षर चळवळ' हे नियतकालिक प्रसिद्ध होतं. विदर्भातल्या बुलढाण्यातून रमेश इंगळे, उत्रादकर वगैरे मंडळी 'शब्दवेध'चे भन्नाट अंक काढत असतात.

श्रीरामपूरसारख्या छोट्या शहरातून सुमति लांडे शब्दालय प्रकाशन चालवतात. वेगळ्या वाटेची पुस्तकं, दिवाळी अंक प्रकाशित करतात. बाबा भांडं याचं साकेत प्रकाशन दर्जेदार पुस्तकं प्रकाशित करतं. पुण्या-मुंबई बाहेर चांगली पुस्तकं प्रकाशित करण्याऱ्या अशा आणखीही काही प्रकाशन संस्था आहेत, ज्यांनी पत मिळविली आहे.

मराठी साहित्याची धुनी पेटती ठेवण्याची आस बाळगणाऱ्या अशा असंख्य ठिणग्या महाराष्ट्रात सर्वदूर विखुरल्या आहेत. त्यातल्या काही अशक्त असतील, कमजोर असतील, त्या विझूनही जातील, पण ज्या सशक्त आहेत त्यांना फुलारण्याचं काम व्हायला हवंय. अखिल भारतीय पातळीवरच्या साहित्य संमेलनाने खरं तर या विखुरलेल्या प्रयत्नांना एकत्र जोडायला हवंय, सांधायला हवंय. पण बाजाराच्या हातात त्यांची सूत्रं असल्याने ते होणे नाही. धडपडणाऱ्या मंडळींनीच परस्परांमधले दुवे जोडायला हवेत. एक मोठी साखळी तयार करायला हवी. त्यासाठी गटतट, हेवेदावे, संकुचित वाद बाजूला ठेवायला हवेत. अखेर मराठी वाङ्मयाची पालखी त्यांनाच पुढे न्यायचीय.

**अंजली कुलकर्णी**
**(सौजन्य - अनुभव)**



**पॉटरच्या अद्‌भूत कथा**

लोकप्रियतेच्या साऱ्या शिड्या झराझर सर करणारा हा हॅरी पॉटर आहे तरी कोण ? बाळगोपाळांच्या पिढ्यानपिढ्यांना वेड लावणाऱ्या, त्यांची वाचनभूक वाढविणाऱ्या 'अरेबियन नाइट्स' आणि 'ॲलिस इन वंडरलँड'लाच नाही, तर साक्षात 'बायबल'लाही त्याने लोकप्रियतेच्या बाबतीत मागे टाकावे? जे. के. रोलिंग या शिक्षिका-लेखिकेचे हे अपत्य कोणत्या मूल्यांच्या जोरावर आज साऱ्या जगाच्या शिखरावर उभे राहून सर्वांना वाकुल्या दाखवीत आहे? एक मात्र खरे, सर्व प्रकारच्या अनिष्ट गोष्टींनी वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून येत असताना हॅरी पॉटर ही एक आनंदाची सुखद झुळूक ठरला आहे. अंगी दैवी गुण असलेला, दुष्टांविरुद्ध लढणारा, चारचौघांसारखा वाटणारा, निरागस अन लोभस वृत्तीचा हॅरी पॉटर नॉर्वेपासून चीनपर्यंत आणि लंडनपासून पुण्यापर्यंत अफाट लोकप्रिय ठरतोय याला योगायोग म्हणायचे की जनसामान्यांच्या दबल्या भावनांचे प्रतिबिंब मानायचे? खपाचे आकडेच्या आकडे हॅरी पॉटरने केव्हाच ओलांडले आहेत. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'हॅरी पॉटर अँड द ऑर्डर ऑफ द फिनिक्स' या पुस्तकाची पहिलीच आवृत्ती १९ कोटी ५० लाख प्रतींची आहे. तरीही त्याला असा काही प्रतिसाद मिळाला की जगभरातील हजारो आई-बापांना या पुस्तकासाठी आगाऊ नोंदणी न केल्याबद्दल आपल्या मुलामुलींकडून शिव्यांचे धनी व्हावे लागले. आगाऊ नोंदणी करूनही शेकडो बालवाचक घरातील वडीलधाऱ्यांना सोबत घेऊन या पुस्तकाची प्रत कधी एकदा हातात पडते म्हणत दुकानांबाहेर पहाटेपासून रांगा लावून उभी राहिली. डोळ्याला गोल चष्मा लावून आणि हॅरी पॉटरसारखा पेहराव करून आलेल्या शेकडो मुलांनी पुस्तकाच्या खरेदीचा प्रसंग अक्षरश: सणासारखा साजरा केला. या पाचव्या पुस्तकामध्ये नेमके काय घडेल, याविषयी सर्वसामान्यांमध्ये असलेले प्रचंड कुतूहल हेरून त्याविषयी आडाखे बांधण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या, तेव्हा त्यामध्येही हजारो बालक-पालकांनी भाग घेतला. न्यूझीलंडमध्ये पंतप्रधान हेलेन क्लार्क यांच्यासारख्या काही उत्साही वाचकांनी तर या पुस्तकाचे अखंड जाहीर वाचन करण्याचा संकल्प सोडला आणि त्याचे सलग २७ तासांचे वाचनही केले.

हॅरी पॉटरला मिळत असलेली अफाट लोकप्रियता आणि त्याच्या पाचव्या भागाबद्दल असलेले औत्सुक्य पाहून कोण्या एका बुद्धिमान साहित्यिक शर्विलकाने तर जे. के. रोलिंग यांच्या शैलीची सहीसही नक्कल करत 'हॅरी पॉटर अँड द ऑर्डर ऑफ द फिनिक्स' लिहिली आणि इंटरनेटवर उपलब्धही करून दिली. काही बालवाचकांची काही काळासाठी त्याने फसगत झाली. पण 'ये असली माल नहीं है' हेही त्यांनी पहिली काही पाने वाचल्यावरच ओळखल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. आज नेटवर 'हॅरी पॉटर'संबंधीची वेबपेजेस पाहिली तर त्यानेही डोळे गरगरायला लागतात.

'ऑर्डर ऑफ फिनिक्स' प्रसिद्ध झाले त्या दिवशी त्यांची संख्या होती ३१ लाख; आणि आता दोन दिवसांत त्यांची संख्या झाली आहे ३२ लाख दहा हजार. अमेरिकेमध्ये पहिल्या दोन दिवसांत ८५ लाख पुस्तके खपल्याचा आणि ब्रिटनमध्ये पहिल्या दिवशी त्यांच्या खपाचा वेग सेकंदाला आठ पुस्तके असा असल्याचे आता जाहीर झाले आहे. आपल्या मुंबई-पुण्यात पहिल्या दोन दिवसांत २५ हजारांवर ही पुस्तके खपली. एकट्या पुण्यात पहिल्या दिवशी हजार पुस्तके संपली म्हणे. हजार प्रतींची एक आवृत्ती काढणाऱ्या आपल्या लेखक-

प्रकाशकांना हेवा वाटावा अशीच ही परिस्थिती. स्वाभाविकच, त्रयस्थांना प्रश्न पडतो की, या पुस्तकामध्ये असे आहे तरी काय? हॅरी पॉटरच्या गोष्टी आणि 'चांदोबा'च्या जुन्या अंकातील जादुभऱ्या गोष्टी यात फारसा फरक नाही. लॉर्ड वॉल्डमॉर्ट या दुष्टाशी लढताना हॅरीच्या आईवडिलांचा मृत्यू ओढवलेला आहे आणि आपल्या आत्याच्या आश्रयाने राहण्याची पाळी त्याच्यावर आलेली आहे. चारचौघांसारख्याच असणाऱ्या हॅरीला अचानक आपल्यातील दैवी शक्तीचा साक्षात्कार होतो आणि दुष्टांपासून विश्वाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडल्याचे भान त्याला येते. त्याला हे समजते, तेव्हा हॅरीचे वय अकरा होते. त्याच्या साहसाच्या कहाण्या म्हणजे ही पुस्तके, त्याच्या दर नव्या इयत्तेप्रमाणे नवे पुस्तक बाजारात आले. सुरुवातीची चार पुस्तके दरवर्षी एक, या नेमाने प्रसिद्ध झाली. पाचव्या पुस्तकाने मात्र बालवाचकांचा अंत पाहिला आणि तब्बल तीन वर्षांनी ते बाजारात आले. या मालिकेतील आणखी दोन पुस्तके बाजारात येणे आता अपेक्षित आहे.

हॅरी पॉटरला मिळणारी लोकप्रियता हा प्रसिद्धी माध्यमांचा खेळ आहे, असा आरोप एका वर्गातून होताना दिसतो. पण म्हणून हॅरी पॉटरचे महत्व नाकारण्याचे कारण नाही. जे. के. रोलिंग यांच्या पाचव्या पुस्तकाचा आज एवढा गाजावाजा झाला असला तरी पहिल्या पुस्तकावेळी ही परिस्थिती नव्हती. आपल्या मुलीसाठी म्हणून त्यांनी लिहिलेल्या या पुस्तकाचे हस्तलिखित पाठविले तेव्हा कोणीही प्रकाशक त्याला हात लावायला तयार नव्हता. मोठ्या मिनतवारीने हे पुस्तक प्रसिद्ध केले गेले आणि त्यासाठी लेखिकेला अगदी अल्पमोल दिले गेले. पुस्तकामध्ये बांधून ठेवण्यासारखे, विलक्षण असे काही होते, म्हणून त्याच्या आवृत्यांमागून आवृत्या आणि पुस्तकामागून पुस्तके निघत गेली. हॅरी पॉटर लोकप्रिय होत गेला आणि आता तर त्याने सात वर्षांच्या काळामध्ये आपल्या लेखिकेला ब्रिटनच्या राणीपेक्षा श्रीमंत करण्याचा पराक्रम केला आहे. अर्थात, **हॅरी पॉटरचा त्याहीपेक्षा मोठा पराक्रम म्हणजे, त्याने मुलामुलींमध्ये निर्माण केलेली वाचनाची आवड.** टीव्हीच्या आहारी गेलेली मुले ही काही फक्त भारतातील पालकांनाच भेडसावणारी समस्या नाही. ज्या मुलांना 'एमटीव्ही' आणि 'डब्ल्यूडब्ल्यूएफ' खेरीज काहीही सुचत नव्हते, अशांना पुन्हा वाचनाच्या दुनियेत आणण्याचे मोठे श्रेय हॅरी पॉटरला जाते. वाचकांना नेमके काय आवडते किंवा हवे असते याचा विचार न करता त्यांच्या माथ्यावर आपल्याला हवे आहे ते मारण्याची वृत्ती सध्या सर्वत्र बोकाळलेली दिसते. तरुणांना फक्त सेक्स व गॉसिपमध्येच रस आहे आणि मुलांना फक्त टीव्हीच हवा आहे, असे मानण्याच्या समजुतीला हॅरी पॉटरमुळे मोठा तडा गेला आहे. मुलांची वाचनाची भूक मोठी आहे. त्यांना उत्तम दर्जाचे, रंजक आणि कल्पनाशकतीला चालना देणारे साहित्य वाचायला मिळाले तर ती त्यावर उड्या मारतात, हे पुन्हा एकवार सिद्ध झाले आहे. समाजामध्ये जे काही चांगले चालले आहे, त्याची उपेक्षा करायची आणि वाईट म्हणून जेवढे आहे त्याला भरभरून प्रसिद्धी द्यायची पद्धत जगभरच्या प्रसिद्धी माध्यमांत रूढ होताना दिसत आहे. आपली माध्यमे तर त्यामध्ये पाश्चात्यांच्या चार पावले पुढेच चालताना दिसतात. त्यांच्या या नकारात्मक दृष्टिकोनाला आव्हान देत निरोगी आणि निरागस आनंद साजरा करण्याची ताकद हॅरी पॉटरकडून समाजाला मिळाली आहे, ही मोठी आश्वासक घटना आहे. आता जबाबदारी आहे ती, ही ताकद टिकवून ठेवण्याची!

लोकसत्तावरून